विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**


**गणपत्रिका क्रमांक : १३७**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष दहावे / अंक १ / जानेवारी २००९



## संपादकीय
## भारताच्या सुरक्षिततेची दशा आणि दिशा

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे सुरक्षिततेच्या मुद्द्यावर चर्चा सुरू झाली. इ.स. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला, त्याचवेळी पाकिस्तानचा जन्म झाला. राष्ट्र म्हणजे फक्त भौगोलिक प्रदेश नसतो; भौगोलिक सीमा असतात. प्रत्येक देशाचा नकाशा त्याच्या सीमा दर्शवत असतो. पण नकाशातला देश म्हणजे राष्ट्र नसते. हे आपण उपहारगृहातील पदार्थांच्या सूचीचे उदाहरण देऊन लक्षात घेऊ शकतो. अशा सूचीतील पदार्थाचे नाव म्हणजे प्रत्यक्ष तो पदार्थ नसतो. त्याचप्रमाणे नकाशात दिसणारा देश हा प्रत्यक्ष देशाच्या सजगतेची खूण नसतो.


इस्रायल या देशाची निर्मितीसुद्धा १९४८ या साली झाली. हा देश, त्याचे अस्तित्व नाकारणाऱ्या इतर देशांनी वेढला आहे. त्याच्या निर्मितीपासून आजवर त्याला अस्तित्वासाठी सतत झगडावे लागले आहे. आपापसात शांततेचा गजर करणारे आंतरराष्ट्रीय नेते, देश इस्रायलला ती शांतता आजही मिळवून देऊ शकत नाहीत. वास्तविक शांतता म्हणजे युद्धबंदी नाही. जेथवर दोन देशांत आकस, दोन समाजांत अन्यायाची भावना आहे, तेथवर प्रत्यक्ष युद्ध चालू नसले तरी शांततेचाही अभाव असतो. राजकीय नेत्यांना वा इतर राष्ट्रांना भरल्यापोटी तत्त्वज्ञान शिकवायला काही लागत नाही. खरे म्हणजे आपल्या सगळ्या चर्चा या शांततेचा मुलामा दिलेल्या फसव्या घोषणांची वांझ देवाणघेवाण असते. आज आफ्रिका खंडात चालणारे टोळीयुद्ध हे देखील अशा फसलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चांचे फलित आहे. कारण या राष्ट्रांच्या अस्तित्वाची चर्चा बाहेरील राष्ट्रे करतात. सुदान, लिबिया, सोमालिया यांनी अजूनपर्यंत केलेल्या धटिंगणशाहीला जगात दुसरे उदाहरण मिळणे कठीण आहे. या सर्व राष्ट्रांत एकाधिकारशाही किंवा टोळ्या राज्य करतात.

चीन हे दुसरे बलाढ्य व धटिंगण राष्ट्र. पहिल्यापासून इतरांना शस्त्रपुरवठा करून व आपला एक तृतीय पंथ प्रस्थापित करत हे राष्ट्र टिकले. सर्वांत मोठे धटिंगण राष्ट्र म्हणजे अमेरिका. आपण सध्या अमेरिकेचे आंधळे सांस्कृतिक अनुकरण करित आहोत. अमेरिकेची सामाजिक शिस्त व काटेकोरपणा, त्यांच्या विद्यापीठातील संग्रहालयांची निर्मिती याचे आपल्याला काही सोयरसुतक नाही. परंतु या चर्चेतून आपल्या राष्ट्राच्या सुरक्षितेचा प्रश्न सुटत नाही.

भोंगळ आशावाद, मुळमुळीत मानवतावाद यांचे पीक ज्या राष्ट्रात मोठ्या प्रमाणात येते तो देश 'राष्ट्र' म्हणून उभा

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा




**वर्ष दहावे / अंक ७ / जानेवारी २००९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १४ वे / अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

# अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गीता आणि दैनंदिन जीवन | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | राग | श्री. यशवंत माने | ६ |
| ३) | ज्ञान व्यवस्थापनाचे ग्रंथालयातील उपयोजन | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | ९ |
| ४) | भारतीय संस्कृती आणि प्रसारमाध्यमे | श्री. शशिकांत गाणार | १२ |
| ५) | तियान्ची तलाव | डॉ. सुधाकर आगरकर | १५ |
| ६) | अभंग संजीवन (पुस्तक परिचय) | आशा भिडे | १८ |
| ७) | भारतीय संस्कृती -बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २२ |
| ८) | बोरकरांची काव्यनिर्मिती - एक आध्यात्मिक साधना | नरेन्द्र नाडकर्णी | २८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ **A/c** दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# गीता आणि दैनंदिन जीवन

## लेखांक दुसरा

*गीता हा जीवनदृष्टी देणारा ग्रंथ आहे. या रोजच्या जीवनाशी अतिशय संबंधित अशा ग्रंथातील महत्त्वपूर्ण तत्त्वाज्ञानाबद्दल मांडलेले विचार या लेखांकात आले आहेत - संपादक*

### कार्यकारणभावाचा उगम:-

निसर्गात सर्वत्र व्यवस्थाच आढळते. संतुलन राखणे हा निर्सगाचा स्थायीभाव आहे. सृष्टीतील सारे व्यवहार अतिशय नियमितपणे प्रवर्तित होतात आणि भविष्यातही असेच नियमित राहतील. हे गृहीत धरुनच जगाचा धांडोळा घेणाऱ्या वैज्ञानिकांनी याच्यासंबंधी नियम बांधले. नियमितपणे जगाचे प्रवर्तन होत असल्याने असे नियम निश्चित करणे त्यांनाही शक्य झाले. निसर्गात हा नियमित-पणा नसता तर अशी अटकळ बांधणे शक्य झाले नसते. या नियमिततेतून कारण आणि कार्य याचा उलगडा करता आला. निश्चित कारण व निश्चित कार्य असे प्रमेय मांडता येऊ शकले. वैज्ञानिक अंतिम कारणाच्या शोधात जरी असले तरी त्यानाही असे मान्य करावे लागले की प्रत्येक कार्याच्या मागे त्याला निश्चित कारण असले पाहिजे. हे पडताळून पाहिले गेले. आंब्यांच्या कोयीपासून आंब्याचेच झाड उगवते हा निसर्गनियम निश्चित आहे यात बदल होत नाही. अन्यथा विश्वातील संतुलन बिघडून जाईल. हाच नियम मनुष्य हेतूलाही लावण्यात आला आहे. यातूनच कर्मसिद्धांताचा उदय झाला. ही सिद्धांतच नीतितत्वाचा पाया आहे. कार्यकारणभावाच्या व्यापक स्तरावर नैतिक आणि अध्यात्मिक या दोन्ही गोष्टींना विशेष महत्व प्राप्त झाले. कर्मसिद्धांताच्या नियमाप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्माला जबाबदार आहे. म्हणजेच स्वप्रयत्नाने ती व्यक्ती स्वत: उन्नत वा अवनत होऊ शकते. थोडक्यात, स्वत:चे जीवन घडविणे हे व्यक्तीच्याच हातात आहे. वाऱ्याच्या झुळकीने गवताची काडी हेलकावे खात रहावी असे काही मानवी जीवन नाही. मानव स्वत:च स्वत:चा उद्धार करू शकतो (उद्धरेत् आत्मानात्यानं) (गी ६/५) मानवाला प्राप्त झालेले हे वरदानच आहे. आमचे भविष्य आमच्या हातात आहे. परमेश्वर याबाबत तटस्थ आहे. नादन्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभु:। ( गी ५/१५) सद्गुणांची यामुळेच विशेष महती आहे.

या कर्मसिद्धांतातूनच त्यागाचा विचार प्रभावी झाला. प्रत्येक जीवाला अनेक जन्म घ्यावे लागतात व उत्क्रांत होत होत तो जीव पूर्णतेला पोहचतो. यामुळे जगतात इतके वैविध्य जाणवते. हेतू शुद्धतेनुरूप मानव उत्क्रांत होत जाईल; हेतू शुद्धतेसाठीच सद्गुणांची आवश्यकता आहे. मानवाने देव व दैव या कल्पनेत न फसता उत्क्रांत होत राहिले पहिजे असे गीता सांगते. हे वैविध्य फक्त बुद्धीला जाणवते; म्हणून बुद्धीची शुद्धता आवश्यक आहे. एक संत - सारे काही एकच आहे अशी धर्माची शिकवण आहे. यावर आधारित संपूर्ण वेदान्ताची रचना झालेली आहे. श्रीकृष्ण म्हणतात, मीच सर्वांचा बीजप्रद पिता आहे. (अहं कृत्सनस्य जगत: प्रभव: (गी ७/६) वासुदेव: सर्वमिती। (गी ७/१९) ईश्वर सर्व काही व्यापून आहे त्याच्या वाचून कोणती गोष्ट असणे सभवंत नाही. सारे काही ईश्वरापासूनच निर्माण झालेले आहे. स्थूल सूक्ष्म ही दोनही रुपे त्याचीच आहेत. विवेकी माणूस ही दोनही रूपे जाणतो. हे जाणून कार्यप्रवृत्त होतो व कल्याण साधतो हा खरा उत्क्रांत होण्याचा मार्ग आहे.

### विज्ञानाने देखील एकत्वाचाच अनुभव :

आजचे विज्ञान निश्चितपणे असे प्रतिपादन करते की

एखादे संकट आल्यावरच स्वत:च्या सामर्थ्याची वा दुबळेपणाची जाणीव होते.

ऊर्जा (Energy) आणि पदार्थ (Matter) भिन्न नसून एकच आहेत. इतकेच नव्हे तर त्या दोघांत अदलाबदल करता येते. हा आइन्स्टाइनचा सिद्धांत जगद्मान्य झाला आहे. वेदान्त विचाराच्या दृष्टीने विज्ञानाने प्रतिपादलेला हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. वेदान्ताने ही भूमिका हजारो वर्षापूर्वीच घेतलेली आहे. आताही भूमिका केवळ तर्क न राहता प्रयोगाने सिद्ध झालेली गोष्ट ठरत आहे. ऊर्जा व पदार्थ यांचे उगम स्थानही एकच आहे. हीच गोष्ट सिद्ध होणे महत्त्वाचे आहे. आता या दोनही ज्ञान शाखांत भिन्नता नसल्याचे सिद्ध झाल्याने वेदान्त विचाराला पुष्टी प्राप्त झाली आहे. आपण सेवन करीत असलेल्या अन्नामुळेच जीव, शरीर, मन, भावना, विचार आदी पुष्ट होतात. अन्न जीवनदायी आहेच, तसेच विविध शक्ती स्त्रोतही त्यात आहेत हे विसरुन चालणार नाही. या साऱ्या शक्ती भिन्न असल्यातरी अन्न या एकाच माध्यमातून त्या पोसल्या जातात. अन्नात् भवन्ति भूतानि(गी ३/१४) शारीरिक व मानसिक शक्ती कार्यपरत्वे एकमेकांत रूपांतरित होऊ शकतात. यावरून हेच सिद्ध होते की एकाच तत्वातून सारे काही व्यक्त दशेला येऊ शकते. यासाठीच भारतीय ऋषींनी नि:संदिग्धपणे जाहीर केले की त्या परमतत्वातूनच सारे काही निर्माण झाले आहे. ही निर्मिती म्हणजे त्या परमतत्वाचीच व्यक्त दशा होय. त्यांचा हा विचार किती अचूक होता हेच आज विज्ञानाने स्पष्ट केले आहे. प्रकाश आणि उष्णता या गोष्टी लाकडात व तेलात सुप्त स्थितीत असतात. संधी प्राप्त होताच ती व्यक्त दशेला येतात. त्याचप्रमाणे ही ईश्वरीय शक्ती अणू रेणूत दडलेली आहे. योग्य अवसर मिळताच तीच व्यक्त होते. आपणास ती पद्धत अवगत नसल्याने आतील सुप्त असलेल्या शक्तीचा बोध होऊ शकत नाही. मात्र त्यात शक्ती नसलीच पाहिजे असा निष्कर्ष काढणे असमंजसपणाचे ठरेल. जीव आणि जाणीव प्रत्येक पदार्थात सुप्त स्थितीत असतात. माती, वीट, आदीत ती जाणीव अतिशय सूक्ष्म असल्याने ती पारखण्यासाठी आपल्याकडे तशी उपकरणे नाहीत. ही जाणीव सद्रुपाने प्रत्येक वस्तूत दडलेली असून योग्य संधी मिळताच तिचे व्यक्तिकरण होते. प्रत्येक वस्तुत देवात्म भाव पाहण्याचे हेच एकमेव कारण असल्याचे आपल्या ऋषींनी उद्घोषित केले आहे.

विश्वात अनुभवाला येणाऱ्या आणखी एका शक्तीचा विचार करू. तिथेही हीच गोष्ट ध्यानात येईल. गुरुत्वकर्षणाने सारे विश्व एका सूत्रात बांधून ठेवले गेले आहे. त्यामुळे सर्व पदार्थ एकमेकांशी संबंधित राहतात. गुरुत्वाकर्षणातील प्रधान शक्ती म्हणजे सर्वांना एकत्र ठेवणे. केंद्राकडे त्यांचे कर्षण करणे, दूर फेकणे हे गुरुत्वाकर्षणाच्या बाबतीत संभवतच नाही. हीच शक्ती मानवी जीवनात वेगळ्या स्तरावर कार्य करताना आढळते. मानव हा सातत्याने एकत्र रहावा, त्यांच्यातील एकोपा टिकावा यासाठी ही शक्ती कार्यरत आहे. या शक्तीलाच प्रेम असे म्हणतात. प्रेम कधी कुणाला दूर लोटत नाही. प्रेमामुळेच मानवाचे जीवन विकसित झाले आहे. दूर लोटणारी शक्ती ही वेगळी शक्ती आहे. तिला द्वेष म्हणतात. सहकारिताच जीवनात सारी यशस्विता संपादन करून देते. सहकारितेच्या बुडाशी प्रेमाचे अधिष्ठान असते. प्रेम हाच जीवनाचा खरा पाया. ईश्वर प्रेम स्वरूप असल्याने त्याजकडे आपण खेचले जातो, यालाच एकत्वाचा अनुभव घेणे म्हणतात. सर्वांभूती प्रेम ही धर्माची शिकवण आहे.

### दु:खाने खचू नका :

विश्व हे परमेश्वराचे विश्रांती स्थान आहे. विश्वातील आपला प्रवास सुखदायक आहे कारण इथेच जीवाला परमात्म्याचा नित्य सहवास लाभतो. परंतु काही लोक याच जीवनाकडे वेगळ्या भूमिकेतून पाहातात व परमात्म्यालाच निंद्य ठरवतात. या जगात दु:ख भरपूर आहे.आणि मानवाने आपल्या वागण्यातून त्यात बरीच भर टाकलेली आहे. मानव सद्विचाराने वागू लागल्यास अनेक दु:खे कमी होतील, शिवाय दु:खालाही जीवनात एक विशेष असे स्थान आहे. हे विसरून चालणार नाही. कारण दु:खे वा संकटे

आल्यामुळेच माणूस त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्नशील राहतो. त्यावेळी त्याच्या ठिकाणी असलेल्या साऱ्या सुप्त शक्ती प्रगट होतात आणि त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. दु:खे जीवनात अवश्य पाहिजेत. त्यातच माणसाची खरी परीक्षा होते. त्या दु:खातून वर येणाऱ्या मानवाची उन्नती होतेच तसेच इतरांना त्याचे उदाहरण अनुकरणीय वाटते. यासाठी गीता सांगते, दु:खाने खचू नका ही एक इष्टापत्ती माना. आपल्या कसोटीची ही वेळ आहे असे समजा. सर्व सद्गुणांचा विकास करण्यास उत्तम संधी प्राप्त होते असे वाटू द्या.

**सहकारितेचे विविध अविष्कार :**

गीता असे म्हणते की जो माणूस केवळ ऐष आरामात दंग होऊन जातो व देवाला विसरतो आणि जो केवळ देव देव करीत बसतो आणि ऐहिकतेला तुच्छ लेखतो हे दोघेही परमात्म्याचाच तिरस्कार करतात. परमात्मा सर्व पदार्थात सर्वांच्या अंत:करणात वास करून राहिला आहे. त्याच्या विराट देहाचे आपण सारे अंग प्रत्यंग आहोत आणि आपणा सर्वांची जीवने एकमेकांशी निगडित आहेत. त्याच्या सर्व निर्मितीबद्दल आदरभाव बाळगून योग्य वर्तन करणे, म्हणजेच त्याची आराधना होय. प्रत्येक कर्म हे देवकार्य आहे. त्या कर्माचे स्वरूप कोणतेही असो. प्रार्थना, ध्यान, धंदा, उदीम, उद्योग, कोणतेही असो. त्याची सेवा म्हणूनच झाली पाहिजे. हा शुद्ध भाव असणे आवश्यक, सहकारितेचा नियम यातूनच निर्माण होतो. जड वा चेतन या दोहोत ईश्वराचेच अस्तित्व आहे आणि त्या विराट पुरुषाचे हे दोनही अवयव आहेत. म्हणून त्या उभयतात सुसंबद्धता, संघटितपणा व सहकार्य असणे अपरिहार्य आहे. तरच ते एकमेकांशी कल्याण साधू शकतील. अशाप्रकारे कल्याण साधता यावे यासाठीच ही सहकारिता विविध रूपांनी व्यक्त होते.

एक यज्ञ, दुसरा लोकसंग्रंह,व तिसरा कर्मफल त्याग यातून सहकारिता व्यक्त होते. अखिल प्राणिमात्रांचे कल्याण साधाण्यासाठी होण्याऱ्या संघटित प्रयत्नाला यज्ञ म्हणतात. जगाच्या कल्याणासाठी कर्म करीत राहणे याला लोकसंग्रह म्हणतात आणि आपल्या चातुर्याने आणि श्रमाने प्राप्त होणाऱ्या कर्माच्या फलाचे वाटप कमनशीबी, गांजलेल्या, पीडीत असलेल्या मानवासाठी करणे हाच कर्मफल त्याग होय. या साऱ्या गोष्टी अत्यंत जोमाने उत्साहाने, आनंदाने ईश्वरीय सेवा भावनेने केल्या गेल्या तर ती खरी परमेश्वर सेवा घडते. निर्हेतुक कर्म करून समाजाचे, जगाचे, कल्याण साधण्यासाठी प्रयत्नशील राहणे हीच खरी ईश्वरी सेवा होय. असे गीता सांगते. हे परस्पर सहकार्यानेच घडते. यामुळे मानवाला वैभव, सुख, समाधान श्रेष्ठ जीवन प्राप्त होते.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

कौटिल्याने शहरातील राजांचे व श्रेष्ठींचे महाल, देवतांच्या मूर्ती व मंदिरे यांची स्थाने कुठे, कशी असावीत याचा ऊहापोह केला आहे. त्यावेळी या वास्तू लाकडाच्या असत. लाकडावरच कोरीव मूर्ती असत. पाषाणाचा वापरही अर्थात होई. सांची - बारहुत स्तूपामध्ये पाषाण व विटा यांचा वापर झालेला दिसतो.

तेराव्या शतकात मुस्लीम आक्रमणानंतर मंदिर बांधणी क्रिया उत्तर भारतात मंदावली, ती दक्षिण भारताकडे अठराव्या शतकापर्यंत चालू राहिली. मंदिरांना कैलासशिल्प अथवा मेरूशिल्प असेही म्हणत.

# राग

*राग ही भावना अनेक समस्यांना जन्म देते. त्यामुळे 'रागावर नियंत्रण ठेवावे ' असे म्हटले जाते. या रागाबद्दलचे काही विचार - संपादक*

राग हा माणसाला विनाशाकडे घेऊन जातो. जीवनामध्ये आपले जे ध्येय असते त्या ध्येयापर्यंत तो पोहोचू देऊ शकत नाही. आपण जी काही प्रगती करतो ती प्रगतीच थांबवण्याचे काम राग करीत असतो. ज्याप्रमाणे संगणकात Virus गेल्यानंतर संगणकाची सर्व यंत्रणाच बंद पडते त्याचप्रमाणे राग हा माणसाच्या मनावर हल्ला (Attack) करीत असतो. त्यामुळे सर्व विचारशक्तीच गोंधळलेल्या अवस्थेत होते. काय करावे हेच सुचत नाही. राग आल्यानंतर तो मनातून लवकर जात नाही. काही दिवस तो मनात घर करून बसतो. त्यानंतर हळू हळू तो कमी होत जातो, त्याची तीव्रता कमी होत जाते. मनावर रागाचा परिणाम ताबडतोब होत असतो. माणसाचे शरीर आतून तो जाळत असतो. सर्वात प्रथम राग आल्यानंतर तो स्वत:चे शरीर जाळत असतो आणि त्यानंतर तो इतरांचेही शरीर आपल्या रागीट बोलण्याने जाळत असतो. म्हणजेच सर्व शरीराचा नाश करण्याची क्षमता रागात असते. जो माणूस रागीट असतो, तो आपली प्रगती करू शकत नाही. त्याचा प्रवास हा विनाशाकडेच चाललेला असतो.

राग हा दोन प्रकारे व्यक्त केला जातो. एक म्हणजे राग आल्यानंतर पटकन समोरच्या व्यक्तीला प्रतिउत्तर देणे किंवा बोलणे आणि दुसरे म्हणजे राग लगेच प्रकट न करता तो नंतर काही वेळांनी / दिवसांनी व्यक्त करणे. काही माणसे अशी असतात की, राग आल्यानंतर लगेच त्याचे प्रतिउत्तरही लगेच तेवढ्याच रागाने देतात ते कशाचाही विचार करत नाहीत. अशाप्रकारे राग व्यक्त करण्याने दोघांचेही नुकसान होत असते. पण काही माणसे अशीही असतात की, ते रागाचे उत्तर नीट विचार करून नंतर देतात. उदाहरणच द्यायचे झाले तर कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याचे देता येईल. ज्यावेळी वरिष्ठ अधिकारी आणि कामगारांचे प्रतिनिधित्व करणारा नेता यांच्यात बोलणी सुरू असतात त्यावेळी त्या अधिकाऱ्याला त्या नेत्याचे काही मुद्दे पटत नाहीत. तरीही तो चेहऱ्यावर राग प्रगट न करता अशा प्रश्नांना हसत सामोरे जात असतो. पण आतून त्याला राग आलेला असतो. तो राग नंतर त्याच्या कृतीतून दिसून येत असतो.

रागामुळे दुसऱ्याचे मन दुखावले जाते त्यामुळे आपल्याबद्दल दुसऱ्यांच्या मनात वाईट भावना होत असते हा सर्वात मोठा तोटा किंवा नुकसान रागामुळे आपले होत असते. माणसे जोडण्याऐवजी तोडण्याचे काम राग करीत असतो. म्हणून रागावर योग्य ते नियंत्रण ठेवले पाहिजे. त्याला आपल्या मनात जास्त वेळ थारा देऊ नये. तो लगेच शांत केला पाहिजे.

ज्याप्रमाणे अग्नी लाकडाला लागतो त्याचप्रमाणे राग माणसाच्या मनाला लागत असतो. लाकूड जर सुकलेले असेल तर अशा लाकडला अग्नी लवकर लागतो. पण तेच लाकूड ओलसर असेल त्याला लवकर अग्नी लागत नाही. माणसाच्या मनाचेही असेच असते. जी व्यक्ती जीवनात सुखी, आनंदी आणि समाधानी असते अशा व्यक्तीला राग लवकर येत नाही आणि आलाच तर ती व्यक्ती त्याकडे लक्ष देत नसते. रस्त्याने चालताना दुसऱ्या व्यक्तीचा धक्का लागला तर अशी व्यक्ती Ok, No problem, Sorry म्हणून पुढे निघून जाते. धक्का देणाऱ्या व्यक्तीवर राग काढत नाही. कारण त्याचे मन ओल्या लाकडासारखे असते. पण जी व्यक्ती जीवनात सुखी, समाधानी नसते, त्यांच्या डोक्यात

अनेक विचारांनी थैमान घातलेले असते, त्या व्यक्तीला जर दुसऱ्या व्यक्तीचा चालताना धक्का लागला तर ती व्यक्ती लगेच अंगावर येते, वसकन खेकसते. ट्रेनमध्ये किंवा बसमध्ये प्रवास करताना आपणास अशा प्रकारचे अनुभव अनेक वेळा येतात. आपण कितीही चांगले बोलण्याचा प्रयत्न केला तर काही व्यक्ती आपल्यावर लगेच रागावतात, वाईट बोलतात. याचे एकमेव कारण म्हणजे जीवनाच्या प्रवासात ते सुखी नसतात, आनंदी नसतात. त्यांची मन:स्थिती गोंधळलेल्या अवस्थेत असते. मनावर त्यांचे नियंत्रण नसते. कार्यालयातील कर्मचारी असेच असतात. केवळ पगार घ्यायचा किंवा नोकरी करायची म्हणून ते काम करीत असतात. त्यांना त्यांच्या कामात रस नसतो. कारण त्यांना जे काम देण्यात आलेले असते त्या कामात आवड नसते. म्हणून ते एक दुसऱ्यावर राग काढताना दिसतात. त्यांना करावे लागणारे काम किंवा देण्यात आलेले काम आवडीचे नसल्यामुळे बोजा वाटते आणि तेही हमालासारखा. तेच काम त्यांनी थोडे अक्कलहुशारीने केले तर बोजा वाटणार नाही. समजा दोन व्यक्तींनी प्रत्येकी २० किलो वजन घेऊन डोंगर चढण्याची शर्यत लावली. २० किलो वजन काय घ्यावे हे मात्र त्यांच्यात नक्की नव्हते. पहिल्या व्यक्तीने २० किलो वजनाचे दगड घ्यायचे ठरवले आणि तो डोंगर चढू लागला. ठरावीक अंतर चढल्यानंतर चालणे असह्य होऊन तो एका ठिकाणी थांबला. पुढे जाणे त्याला शक्य नव्हते. दुसरी व्यक्तीही ठरावीक अंतर चढल्यानंतर थकली आणि एके ठिकाणी विश्रांती घेण्यासाठी बसली. पण या व्यक्तीने सोबत जे २० किलो वजन घेतले होते ते भाजी, भाकरी, पाणी इ. त्यांनी विश्रांतीच्या ठिकाणी पोटभर खाल्ले आणि पहिली व्यक्ती त्याच ठिकाणी बसून राहिली. तात्पर्य काय तर कोणतेही काम करताना ते थोडे अक्कलहुशारीने केले म्हणजे त्यामध्येही यश मिळवता येते. त्यामध्ये आनंद मिळवता येतो. वाटणारा बोजा कमी करता येतो. पण त्या कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र बदलला पाहिजे. ज्याप्रमाणे शिल्पकार दगडाला दगड म्हणून पहात नाही त्यामध्ये एक सुंदर मूर्ती तो पहात असतो. अशा दृष्टिकोनातूनच आपण आपल्या कामाकडे पाहिले पाहजे. दिलेल्या कामात काय सुधारणा करता येतील? ते काम कशा पद्धतीने सुरळीत हाताळता येईल याचा विचार करायला पहिजे. देण्यात आलेले काम चिकाटीने आणि कौशल्यपूर्वक केले पाहिजे. एक खेळाडू ज्याप्रकारे खेळात आनंद घेत असतो त्याचप्रमाणे आपण आपणास दिलेल्या कामात आनंद घ्यायला शिकले पाहिजे. अशा पद्धतीने विचार केला तर कोणत्याही व्यक्तीला कोणतेही काम हा बोजा वाटणार नाही. एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्या आवडीचे काम करण्यास सांगितले तर ते बिनतक्रार आणि आवडीने केल्याचे अनेकवेळा आपल्या लक्षात येते. राग व्यक्त करण्याचे हेही एक कारण असू शकते.

दुसऱ्या व्यक्तीच्या बोलण्यामुळे आपणास राग येत असेल तर आपण एक गोष्ट करायला हवी, ती म्हणजे अशा व्यक्तीना लगेच प्रतिउत्तर देऊ नये. थोडा वेळ थांबूनच काय ते आपले मत द्यावे. राग आल्यानंतर थोडावेळ मौन धारण करावे जोपर्यंत राग कमी होत नाही. तोपर्यंत मोजकेच बोलावे. ज्या व्यक्तीशी आपले पटत नाही किंवा त्यांचे विचार पटत नाहीत अशा व्यक्तीशी शक्यतो बोलणे टाळावे. कामाशिवाय त्यांच्याशी बोलू नये. दुसरी व्यक्ती आपल्यावर कितीही रागावली तर अशा वेळी आपण शांत राहिले पाहिजे. यातच दोघांचेही हित असते. शहाणी किंवा बुद्धिवान व्यक्ती वादात्मक प्रसंगाच्या वेळी दुसऱ्यासमोर झुकलेली दिसून येते. अशा व्यक्तीनाच नावलौकिक किंवा अधिक किंमत मिळत असते. तराजूमध्ये वस्तूंचे वजन करतांना जी बाजू झुकलेली असते त्या वाजूलाच अधिक किंमत असते, किंवा त्यामधील वस्तूंचीच किंमत जास्त असते. म्हणून तर बुद्धिवान व्यक्ती नम्र, दयाशील, समाशील आणि लीन दिसून येते.

परमेश्वर सर्व ठिकाणी व्यापलेला आहे. आपण परमेश्वराचा एक अंश आहोत असे म्हणतो; मग परमेश्वर कोणावर रागावतो का? तो कोणाचे वाईट करतो का? तर नक्कीच नाही. तो शांतीचा एक महासागर आहे. अग्नी जशी समुद्राला आग लावत नाही तसेच आपले मन असावे. मनावर राग, लोभ, मोह, अहंकार यांपैकी कशाचाही परिणाम होऊ देऊ नये. ज्या ठिकाणी राग असतो, त्या ठिकाणी शांती नसते आणि ज्या ठिकाणी शांती असते त्याठिकाणी राग नसतो. म्हणून तर सद्गुरु वामनराव पै म्हणतात, आपल्या मनात शांती ठेवायची की राग ठेवायचा हे तू ठरवायचे आहेस, कारण तूच आहेस तुझ्या जिवनाचा शिल्पकार.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी-१०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प), जि. ठाणे.

●●●

## मकरसंक्रात

दिवाळीचा सर्वांचा आवडता सण अत्यंत उत्साहात साजरा केल्यानंतर आपल्याला काही दिवसांतच गोड गुलाबी थंडीची चाहूल लागते व अत्यंत उत्साहपूर्ण असे हवामान असताना सर्वांना एकत्र आणणारा मकरसंक्रात हा पौष महिन्यातील महत्त्वाचा सण येतो. दरवर्षी १४ जानेवारीला सूर्य मकर राशीत प्रवेश करतो म्हणून याच दिवशी आपण मकरसंक्रातीचा सण साजरा करतो. याविषयी पौराणिक कथा अशी आहे की संकरासूर नावाचा महादुष्ट राक्षस लोकांना फार उपद्रव देई यावेळी देवीने संक्रातीचे रूप घेतले व त्या संकरासूराला ठार मारून लोकांना सुखी केले. पौराणिक काळापासूनही दुष्प्रवृत्तीच्या लोकांपासून सत्प्रवृत्त लोकांचा छळ होण्याची परंपरा चालूच आहे. परंतु काही काळानंतर सत्प्रवृतीचाच नेहमी विजय होतो हे सध्याच्या परिस्थितीतल्या काही घटनांवरून आपल्या प्रत्ययास येते.

आपल्या सर्वच सणांची पार्श्वभूमी ही त्या त्या ऋतुंतील हवामानाच्या बदलांमुळे होणाऱ्या परिणामाशी निगडित असून आपण बदलत्या ऋतुमानाशी जुळवून घेऊन जास्तीत जास्त आरोग्यसंपन्न कसे राहू हा महत्वाचा दृष्टिकोन यामागे आहे. यामुळे आपल्या पूर्वजांच्या परंपरेचे व दूरदृष्टीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कारण १४ जानेवारीला म्हणजे संक्रातीच्या दिवसापासून सूर्य मकर राशीत प्रवेश करतो व याला मकर संक्रमण असे म्हणतात. खरोखर प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात नेहमी संक्रमणावस्था ही येतच असते. ‘‘नेहमीच एक सुखाची किंवा दु:खाची अवस्था टिकून राहात नाही Fortune rotatas like a wheel त्याला आपण सर्वजण समजुतीने सामोरे जाणे तसेच या निसर्गातील संक्रमण काळातील ऋतुमानातील फरकालाही सामोरे जाण्यासाठी थंडीच्या मोसमात येणाऱ्या मकरसंक्रातीच्या सणाला गुळाच्या पोळ्यांवर भरपूर तूप घेऊन त्याचा आस्वाद घेतो. तसेच मकरसंक्रातीच्या आदल्या दिवशीच्या ‘भोगी’ या सणाला सूर्योदयाच्या वेळी गरमागरम मुगाच्या डाळीची खिचडी, भरल्या वांग्यांची भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी असा बेत असतो. या सर्व उष्ण व शक्तिवर्धक पदार्थांमुळे आपल्या शरिराला कडक थंडीशी सामना करण्याची शक्ती येते. तीळ वापरण्यातला दुसरा अर्थ स्निग्धता म्हणजेच स्नेह, मैत्री. तीळाचे गुळाशी मिश्रण केल्याने स्नेहाची गोडी अधिक वाढावी असा हेतू ‘तिळगूळ घ्या, गोड बोला’ या प्रथेमागे आहे, असलेले स्नेहसंबध वाढावेत, नवीन संबंध जुळून यावेत, दुरावलेले संबंध जुळावेत हा एक उदात्त असा सामाजिक दृष्टीकोन या मागे आहे. तसेच या दिवशी नूतन वधूवरांचा संक्रातीसण साजरा करतात. यावेळी त्या मुलीला काळी खडीची सुंदर साडी देऊन त्यावर पांढऱ्याशुभ्र हलव्याचे उठून दिसणारे दागिने घालण्याची प्रथा आहे.

(पृष्ठ १७ वर)

# ज्ञान व्यवस्थापनाचे ग्रंथालयातील उपयोजन

*ज्ञान व्यवस्थापनाच्या आव्हानामुळे ग्रंथालयांवर पारंपारिक कार्यकक्षा, स्वरुप बदलत आहे. प्रा. श्रीनिवास आठल्ये यांनी ज्ञान व्यवस्थापनाच्या शाखेचा करून दिलेला हा परिचय - संपादक*

**प्रस्तावना :**

ज्ञानाला जगात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्ञानाच्या जोरावरच मानव आपली प्रगती करून घेऊ शकतो. मात्र अनावश्यकपणे भारंभार साठवलेले ज्ञान हे भारदस्त न वाटता भारभूत वाटू लागते. त्यामुळेच ज्ञान व्यवस्थापनाची गरज असते व ज्ञान व्यवस्थापन ही शाखा स्वतंत्रपणे विकसित होत असलेली आढळते.

**ज्ञान व व्यवस्थापन :**

प्रारंभी आपण ज्ञान व व्यवस्थापन यांच्या व्याख्या स्वतंत्रपणे समजावून घेऊ.

ज्ञान म्हणजे जाणीव किंवा विषयाचे आकलन. ज्ञान म्हणजे अशी मानवी क्षमता, की जी आपल्या अनुभवाच्या जोरावर सारासार विचार करून निर्णय घेऊ शकते.

सुसंगतपणे केलेली रचना म्हणजे व्यवस्थापन. व्यवस्था लावणे किंवा नियमन करणे याला व्यवस्थापन म्हणतात.

**ज्ञान व व्यवस्थापन (Knowledge Management) :**

व्यावसायिक मूल्ये वर्धित करणे व स्पर्धात्मक फायदा उत्पन्न करणे यासाठी केलेली पद्धतशीर रचना म्हणजे ज्ञान व्यवस्थापन होय. ज्ञान व्यवस्थापन ही एक अशी प्रक्रिया आहे की जी माहिती व गुणात्मक घटकांचे रूपांतर अनुभवात करते. म्हणजे ते लोकांमध्ये अशी जोडणी करते की जेव्हा त्यांना गरज असते तेव्हा ते असे ज्ञान वापरू शकतात. योग्य व्यक्तीला योग्य वेळेत योग्य ज्ञान मिळवून देणे हा यातील महत्त्वाचा भाग आहे. आपल्याला कोणत्या प्रकारचे ज्ञान हवे आहे, ते कसे व कोठून प्राप्त करायचे कोणत्या वेळेस वापरायचे याचे नियोजन करण्याचे काम ज्ञान व्यवस्थापन करते.

उदाहरणार्थ, एखाद्या वाचकाला विशिष्ट विषयात अभ्यास करायचा आहे. तेव्हा त्या त्या विषयातील उपयुक्त वाचनसाहित्याची सूची संदर्भ साधन म्हणून उपलब्ध करून देणे याचाच अर्थ ज्ञानाचे व्यवस्थापन करणे होय. यामुळे वाचकाचा वेळ वाचतो. तसेच त्याच्या अभ्यासासाठी आपोआपच संदर्भ प्राप्त होतो.

संकलन, संग्रहण व प्रसारण हे ज्ञान व्यवस्थापनाचे तीन भाग आहेत. संकलन म्हणजे वाचकांना उपयुक्त असे ज्ञानसाहित्य सुसंगतपणे वापरास तयार ठेवणे व प्रसारण म्हणजे वाचकास योग्य ज्ञानसाहित्य अचूकपणे व तत्परतेने उपलब्ध करुन देणे. (आकृती क्र. १ पहा)

ज्ञान व्यवस्थापन

संकलन संग्रहण प्रसारण


**(आकृती क्र. १ ज्ञान व्यवस्थापनाचे भाग)**

**ज्ञान व्यवस्थापनाचे ग्रंथालयातील उपयोजन :**

ग्रंथालयाला ज्ञानाचे भांडार म्हणतात. त्यामुळे ज्ञान व्यवस्थापनाची गरज ग्रंथालयात जास्त प्रमाणात भासते. त्यासाठी व्यवस्थापनाची विशिष्ट अशी पद्धती (System) अवलंबावी लागते.

समस्या सारख्याच असल्या तरी, दृष्टिकोन वेगळा हवा.

ज्ञान व्यवस्थापनाचे ग्रंथालयातील उपयोजनाचे पुढील चार घटक आहेत. (आकृती क्र. २ पहा)




**आकृती क्र. २ ज्ञान व्यवस्थापनाचे ग्रंथालयातील उपयोजनाचे घटक**

**अ) वाचक अभ्यास (User Study) :**

ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांचा अभ्यास केला जातो. त्याला वाचक अभ्यास असे म्हणतात. वाचक कोणत्या वयोगटातील आहेत, त्यांच्या वाचनाच्या आवडी कोणत्या, त्यांचे अभ्यासाचे विषय कोणते हे जाणून घेतले जाते. ज्ञानाचे संकलन करण्यसाठी, तसेच ग्रंथनिवड व ग्रंथालयीन सेवा पुरवण्यासाठी याचा उपयोग होतो. वाचक अभ्यास करण्यासाठी पुढील साधनांचा वापर केला जातो.

**१) प्रश्नावली :** प्रश्नावली म्हणजे लिखित प्रश्नमालिका, ही वाचकांकडून भरून घेतली जाते. याद्वारे वाचकांचा वाचनविषयक कल जाणून घेतला जातो.

**२) मुलाखत :** वाचकांना तोंडी माहिती विचारुन घेऊन त्यांच्या वाचनविषयक गरजा याद्वारे जाणून घेतल्या जातात.

**३) नोंदी :** वाचक कोणत्या वाचनसाहित्याची मागणी करतात, तसेच ग्रंथालयात कोणत्या ग्रंथांच्या देवघेवीची नोंद ठेवली जाते, त्यावरून कोणते वाचक कोणत्या प्रकारच्या वाचनसाहित्यास प्राधान्य देतात, ते कळते.

**आ) उपयुक्त वाचनसाहित्य संग्रह (Collction Development) :**

याचा अर्थ असा की वाचकांच्या अभ्यास विषयाशी निगडित वाचनसाहित्य ग्रंथालयात हवे. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह हो केवळ संख्यात्मक (Quantitive) असण्यापेक्षा तो गुणात्मकही (Qualitative) असायला हवा. यासाठी पुढील मुद्दे विचारात घेतले जातात.

**१) अद्ययावतता :** ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह हा अद्ययावत असला पाहिजे. विशिष्ट विषयाशी निगडित अशी सर्व ग्रंथसंपदा ग्रंथालयात उपलब्ध हवी. यासाठी प्रकाशनसूची, ग्रंथपरिचय इत्यादी माहितीचा आधार घेतला जातो.

**२) नियतकालिके :** ग्रंथांच्या तुलनेत नियतकालिके जास्त अद्ययावत माहिती पुरवत असतात. तसेच विशिष्ट विषयाला वाहिलेली काही नियतकालिके असतात. त्यात त्या विषयांशी निगडित माहिती सर्वप्रथम प्रकाशित होते. त्यांना मुख्य नियतकालिके (Core Journals) असे म्हणतात. त्यांचाही समावेश ग्रंथालयात असायला हवा.

**३) संदर्भ साधने (Reference Tools) :** कोणत्याही विषयातील आधारभूत अशी प्रारंभिक माहिती संदर्भ साधनाद्वारे पुरवली जाते. तसेच विशिष्ट विषयातील आणखी माहिती प्राप्त करण्याचेही संदर्भ त्यात दिलेले असतात. विविध अहवाल, ज्ञानकोश, प्रबंध इत्यादी संदर्भ साधनांचे ग्रंथालयात संकलन करावे.

**इ) तत्पर व अचूक सेवा :**

कोणतीही गोष्ट बिनचूकपणे व वेळेवर प्राप्त झाली तर तिचे मूल्य अधिक असते, बिनचूकपणासाठी संग्रहण व वेळेवर प्राप्त होण्यासाठी यांचे नियोजन सुव्यस्थित असावे लागते. यासाठी आवश्यक घटक असे आहेत.

**१) प्रशिक्षित सेवक :** ग्रंथलयातील वाचनसाहित्य, तसेच सेवा यांच्याशी जवळीक राखण्यासाठी प्रशिक्षित सेवकांची नितांत गरज असते. संकलित वाचनसाहित्याचे उत्कृष्ट संग्रहण व माहितीचे प्रसारण तो करतो.

**२) संदर्भ सहाय्यक :** संदर्भ साधनांची जाण असणारा संदर्भ सहाय्यक हा प्रत्यक्ष सेवा देत असतो. अनेक प्रकारच्या नोंदी ठेवण्याचे काम तो करत असतो. कोणत्याही धोरणात्मक निर्णयाला त्या नोंदींचा आधार घेता येतो.

**ई) अद्यायावत ज्ञानसाधने :**

आजकाल माहिती ही ग्रंथस्वरूपातच नव्हे, तर अन्य चुंबकीय अथवा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातही उपलब्ध असते. ज्ञानाचे प्रसारण हे निरनिराळ्या स्वरूपाच्या माध्यमाद्वारे होत असते. केवळ एकाच स्वरूपात (Form) वाचनसाहित्य संकलित करणे म्हणजे ज्ञानाचा अपुरा साठा बाळगणे होय. हे टाळण्यासाठी पुढील सर्व स्वरूपातील वाचनसाहित्य संग्रहित करावे.

**१) ग्रंथेतर साहित्य :** हस्तलिखित, पोथ्या, पत्रे, डायऱ्या वगैरे ग्रंथेतर साहित्याचा चांगला उपयोग होतो.

**२) इलेक्ट्रॉनिक साधने :** एक उत्कृष्ट संग्रहसाधन म्हणून सीडी व तत्सम इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर केला जातो हे ओळखून अशा प्रकारच्या साधनांचा संग्रह करावा. काही प्रकाशने व नियतकालिके ऑन लाईन उपलब्ध असतात. त्यांचाही उपयोग करावा.

**३) अहवाल :** विविध परिषदा, परिसंवाद यातील कामकाजाचे अहवाल वाचकांना उपलब्ध करुन द्यावेत. तसेच रिप्रिंट, प्रिप्रिंट यांची उपलब्धताही ग्रंथालयात असावी.

**ज्ञान व्यवस्थापनामुळे ग्रंथालयात होणारे फायदे :**

१) वाचकांची अभिरुची जाणून वाचन साहित्य संकलित करता येते.

२) उपलब्ध वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर करणे शक्य होते.

३) योग्य वाचकाला योग्य वाचन साहित्य योग्य वेळेत मिळावे, अशी पद्धती (System) राबवता येते.

**सारांश :**

ज्ञान व्यवस्थापन हा नव्या युगाच्या मंत्र आहे. वाचकांच्या अभिरुची जाणणे, त्यानुसार वाचनसाहित्य संकलित करणे, उपलब्ध वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर करणे, तत्पर व अचूक अशी ग्रंथालसेवा पुरवणे हे सर्व ज्ञान व्यवस्थापनामुळे शक्य होते. आधुनिक ग्रंथालयाचे ते एक अविभाज्य अंग आहे.

**संदर्भ :**

१) आपटे, वासुदेव गोविंद (संपा.) - मराठी शब्दरत्नाकर पुणे : अनमोल, १९९७, पृ. ७८४

२) Halale, Mahesh - Management Information System, Mumbai: Himalaya, 2007, P. 284

३) Singh, D. K. and Singh, B. K. - Knowledge Management and Higher Education, In University News, V. 43, I.1, New Delhi : AIU, Jan 03, 2005, P. 11.

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल, स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
आयरे मार्ग, दत्तनगर,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८

●●●

# भारतीय संस्कृती आणि प्रसारमाध्यमे

*प्रसार माध्यमांतील जाहिराती, ब्रेकिंग न्यूज, प्रसार माध्यमांसाठीचे नियम या सर्व विषयांचे आयाम मोठे आहेत. त्या संदर्भात मांडलेले काही विचार-*

सध्या दोन प्रकारच्या प्रसारमाध्यमांचा आपण अनुभव घेतो. एक मुद्रित माध्यम आणि दुसरे दृकश्राव्य माध्यम, मुद्रित माध्यमांमध्ये वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यांचा समावेश होतो तर दृकश्राव्य माध्यम प्रकारात रेडिओ, दूरचित्रवाणीवरील विविध चॅनेल्स, व्हिडिओ-ऑडिओ आणि इंटरनेटचा समावेश होतो. या दोन्ही माध्यमांची परिणामकता वेगवेगळी असली तरी जनमानसावर प्रभाव ठेवून असणारी ही माध्यमे आहेत. यात सध्यातरी दृक्श्राव्य माध्यमांचा वाटा मोठा आहे. त्यांची उपयोगिता आजच्या काळात जास्त असल्याचे आपणांस जाणवते.

सध्याच्या काळात आपल्या घरातील चित्र आपल्या नजरेसमोर आणाल तर आपल्याला याची कल्पना येईल की घरातील सर्वजण रात्रीच्या वेळी एकत्रितपणे जेवण करीत आहे; परंतु जेवणापेक्षा प्रत्येकाचे लक्ष हे घरातील दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमात अधिक गुंतलेले पाहतो. आपण जेवत असतो ते एक यांत्रिकपणा म्हणून परंतु आपले मन मात्र टीव्ही सिरीयल अथवा तत्सम चालू असलेल्या कार्यक्रमात असते. त्या कार्यक्रमात दिसणाऱ्या प्रसंगानुसार आपल्या सर्वांच्या भावना बदलत असतात. हा बदल गेल्या काही वर्षात झपाट्याने वाढत आहे. पूर्वी प्रसारमाध्यमांचा उपयोग आपल्या जीवनात आठवड्यातून काही तासच असायचा, तो मनाला विरंगुळा मिळण्यासाठी अथवा काही काळ आपली करमणूक होण्यासाठी असायचा. परंतु आता मात्र प्रसारमाध्यमे ही आपल्या दैनंदिन जीवनाचे एक अविभाज्य भाग बनली आहेत. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे सर्व विश्व हे एक खेडेगाव बनल्याचे चित्र आपण अनुभवत आहोत. यात सर्वात मोठा वाटा कुणाचा असेल तर प्रसार माध्यमांचा आहे. केवळ माहिती, ज्ञान नव्हे तर ही माध्यमे अधिकाधिक वेळ व विविध प्रकारचे स्वरूप बदलून भेटीसाठी येताना आपण पाहतो. जसजसा प्रसार माध्यमांचा विस्तार होत आहे व त्याचे प्रभाव क्षेत्र वाढत आहे, तसतशी आपली जीवनशैली बदलत चालल्याचे आपणास लक्षात येईल.

पूर्वीची प्रसारमाध्यमे अधिकाधिक माहितीपूर्ण व समाजाच्या प्रत्येक अंगोपांगांचा विचारपूर्वक प्रसार होण्याच्या दृष्टीने चालवण्यात येत होती. परंतु सध्याचे युग हे जाहिरातीचे युगच असल्यामुळे माहिती ज्ञान यांच्यापेक्षा अधिकाधिक महत्त्व हे जाहिरातींना आलेले आहे. कारण माहिती ज्ञानापेक्षा प्रसारमाध्यमांची आर्थिक संपन्नता हा विषय आजच्या युगात फार मोठा ठरत आहे.

विविध वाहिन्यांवरील कार्यक्रम पाहताना आपल्या हेच लक्षात येईल की आपण एखादा कार्यक्रम पहाण्याऐवजी जाहिरात सत्र पाहत आहोत. कारण प्रत्येक वाहिनीवरील कार्यक्रम हा त्या जाहिरातींच्या आधारावरच चाललेला आपण पाहतो. या जाहिराती अनेक प्रकारच्या क्रीडास्पर्धा आयोजित करताना आपण पाहतो. आपापले उत्पादन खपावे यासाठी विविध प्रकारच्या युक्त्या वापरून कल्पकतेने जाहिराती बनविल्या जातात. अनेकदा या जाहिरातींचा आणि प्रत्यक्ष त्या उत्पादनाचा काही संबंध आहे की नाही, याचा आपणास विचार करावा लागतो.

प्रसारमाध्यमांची भूमिका म्हणजे केवळ उत्पादित कंपन्यांचा माल संपण्यासाठी जाहिरातींच्या माध्यमातून प्रयोजनाची कल्पकता आहे का? याचाच आपणास विचार

प्रसार माध्यमांद्वारे भारतीय संस्कृतीवर आक्रमण होताना पहात बसतो. भारतीयांच्या मनात परकीय अनुकरणाची तसेच स्पर्धेची प्रवृत्ती वाढत चालल्याचे आपणास दिसते त्यामुळे आपणच आपल्या हाताने नवनवीन समस्यांना निमंत्रण देत आहोत. मृगजळाप्रमाणे बेगडी सुखांमागे धावत आहोत त्यामुळे समाजातील नीतिमूल्ये नाहिसे होत असताना आपण पहात आहोत. व्यक्तिनिष्ठ, भोगवादी विदेशी विचार आपल्याला अनैतिक मार्गाने घेऊन जात आहेत, याचे भान आपल्याला राहिलेले नाही. विदेशी समाजजीवन गेल्या २०० ते ३०० वर्षात साम्यवाद, साम्राज्यवाद, पुंजीवाद यातच अडकून पडल्याचे दिसते. त्यामुळे अधिकच गोंधळ वाढलेला आहे. सातत्याने होणारे घटस्फोट, विभक्त कुटुंबव्यवस्था, तसेच माता पित्यांच्या छायेला मुकलेल्या बालकांच्या समस्यांमुळे संपूर्ण जनजीवनच विस्कळीत झाल्याचे आपणास दिसते.

परंतु आपल्याकडील या क्षेत्रात कार्यरत असणारी उच्चपदस्थ मंडळी मात्र पाश्चत्य शिक्षणाने विद्वत्ता प्राप्त केल्यामुळे भारतीय संस्कृतीची जीवनमूल्ये हरवून केवळ प्रचाराची मांड ठोकून सर्वत्र भोगवादाची परंपरा निर्माण करताना दिसत आहेत आणि आपणही पाश्चिमात्यांप्रमाणे कोणत्याही क्षेत्रात मागे नाही, हेच दाखवून देत आहेत.

पाश्चात्त्यांची भोगवादी संस्कृती आपल्याही देशात रूळावयास लागलेली आपण पहातो. भोग भोगल्याने आणि सातत्याने त्याच्याच मागे लागल्याने भोगेच्छा एवढी वाढते की ती भोगवाद्यालाच नष्ट करून टाकते. आपल्याकडील गृहिणी आणि माता या देखील या भडक उपभोगवादी जाहिरातींना बळी पडत चालल्याचे चित्र दिसते. त्यामुळे भविष्यकाळात चारित्र्यनिर्मितीचा स्त्रोतच खंडित होईल हा धोक्याचा इशारा आपले विद्वान देत आहेत. मोठ्या शहरांतून ते प्रत्येक खेडेगावात प्रत्येक वाहिनी पोहोचल्याने जाहिरातीच्या माध्यमातून उपभोगाची परंपराच नव्याने निर्माण होत असल्याचे आपणास लक्षात येईल. करावा लागेल. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करून गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत गावातील सुंदरीपासून ते विश्वसुंदरीपर्यंतच्या स्पर्धांना अवाजवी प्रसिद्धी महत्त्व देऊन सातत्याने त्याचा मारा ''Breaking News'' च्या नावाखाली केला जातो. सौंदर्य प्रदर्शनाच्या या स्पर्धेच्या नावाखाली असंख्य जाहिरात कंपन्या आपल्या मालाच्या जाहिराती प्रभावीपणे करीत असतात, त्याचा परिणाम म्हणजे आजकाल गल्लोगल्लीत ब्युटीपार्लरची संख्या वाढत आहे.

आज आपण अनुभवत आहोत की प्रसारमाध्यमांच्या जाहिरातींच्या माऱ्यामुळे खेडोपाडीसुद्धा एकवेळ पिण्याचे पाणी मिळणार नाही परंतु पेप्सी, कोको यांसारखे शीतपेये प्रत्येक टपरीवजा दुकानांत आपल्याला दिसून येतील. सरकारी योजनेतूनही जेथे पिण्याच्या पाण्याचे टँकर पोहचू शकत नाही तेथे विविध शीतपेयांची सर्रास रेलचेल आपणांस पहावयास मिळते. सर्वसामान्य माणसाच्या प्राथमिक गरजाच यामुळे बदलून गेलेल्या आपण पाहतो.

नुकत्याच झालेल्या IPL क्रिकेट सामन्यांच्या स्पर्धेतसुद्धा आपणास हेच आढळून येईल पूर्वी किमान एक षटक संपल्यानंतर एखादी जाहिरात दिसत असे आता तर प्रत्येक चेंडू टाकल्यानंतर जाहिरातीचा माराच चाललेला दिसतो. किंबहुना टीव्हीच्या छोट्या पडद्यावर क्रिकेट मॅचचे चित्र कमी झाले आणि त्याच्या आजूबाजूला जाहिराती चालू झालेल्या आपणास दिसून येतात. म्हणजेच आपण नेमके काय पहात आहोत, हेच आपणास कळणार नाही इतके महत्त्व प्रसारमाध्यमात जाहिरातींनी व्यापलेले आहे. या जाहिराती तरी कशा प्रकारच्या असतात, तर अनेक तरुणांना व्यसनाधीनतेकडे नेणाऱ्या विविध सिगारेट, गुटखा आणि मद्यांच्या जाहिराती झळकतात. खेळाची जागा आता अनेक सिनेतारका, उद्योजक आणि धनाढ्य श्रीमंत व्यापारी यांनीच व्यापलेली आपण पाहतो.

कुटुंबे व्यक्तिकेंद्रित होऊन विभाजित होऊ लागली आहेत. त्याचा अनिष्ट परिणाम आता दिसू लागलेला आहे. आत्मकेंद्रितपणामुळे भग्न व्यक्ती व उध्वस्त कुटुंबे यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागल्याचे आपणास दिसते. सुखसाधने आपल्याकडे असावीत या विचाराने प्रेरित होऊन प्रत्येकजण यासाठीच धडपडत आहे. यामुळे सातत्याने स्पर्धा वाढते त्यातून इर्षा निर्माण होते. एखादी गोष्ट दुसऱ्याकडे असेल तर ती आपल्याकडे कशी येईल त्यासाठी किती धडपड करावी लागली तरी चालते. परंतु एकदा इच्छा निर्माण झाली की त्यातून स्पर्धा आणि इर्षा ह्यांचा उगम होतो.

माणसाला पशुत्वाकडे नेणारी स्वार्थभावना दिवसेंदिवस वाढत आहे. इतरांना लुबाडून किंवा हिंसेचा अवलंब करूनही मी माझ्या वासना तृप्त करीन, हा राक्षसी विचारही केंद्रस्थानी येऊ पहात आहे. अशा घटनांची प्रचिती - गुन्हेगारी प्रवृत्ती छोट्या मोठ्या पडद्यावरील खलनायकांच्या लीला पाहून आणि त्याचे अनुकरण केल्याची कबुली आताचे तरुण देतात हे पाहून शरमेने मान खाली घालावी लागते.

सध्याची प्रसारमाध्यमे ही सत्ता, संपत्ती आणि सौंदर्य या तीनच गोष्टींभोवती फिरताना दिसतात. या तीनही गोष्टी मिळाल्या की सर्वसामान्य माणसांना जगातील सर्व यश आणि भाग्य मिळाल्यासारखे वाटते आणि या तीनही गोष्टी न मिळाल्याने दु:खी - कष्टी व्हावे लागते. ज्येष्ठांचा समंजसपणा व नव्या पिढीतील कृतज्ञतेची भावनाच संपल्याने सध्या वृद्धाश्रम अपुरे पडू लागले आहेत आणि घरात आराम खुर्चीची अडचण होऊ लागली आहे. यातच आणखी एका गोष्टीची चिंता वाढली आहे. सध्या पालकच मुलाच्या भवितव्याच्या मागे लागलेत. हा 'करिअरीझम' म्हणजेच येनकेन प्रकारे पैसा कमविण्याचे साधन आहे, असा भोगी विचारच सर्वत्र रूढ झालेला पहावयास मिळतो.

भारतीय संस्कृतीत कुटुंबाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आणि मध्यवर्ती आहे. हेच संस्काराचे प्रमुख क्षेत्र आहे. व्यक्ती व समाज यांची आदर्श रचना विनासायास होऊ शकते. आवश्यकता आहे ती आपल्या पिढीच्या कर्तव्याची आणि कृतज्ञतेची. भौतिकतेला विटून जाऊन आजही अनेक लोक नि:स्वार्थी प्रेमाच्या शोधात आहेत. सुदृढ संस्कारच त्यांची ही भटकंती थांबावू शकतील नराला 'पशू' होऊ न देता त्याला 'नारायण' करणारे श्रेष्ठ दैवी गुणसंपन्न, चारित्र्यसंपन्न व्यक्तीच्या निर्मितीचे केंद्र कुटुंब हेच आहे आपल्या संस्कृतीच्या भौतिक विचारांचा पाया कायम ठेवून व्यवहार आचार विचार करावा लागेल. पाश्चात्त्यांच्या अंधानुकरणाचे मोहपटल बाजूला सारून, आपण सर्वजण मिळून गुणसमृद्ध समाजजीवन उभे करू या.

**श्री. शशिकांत गाणार**
स्वामी विवेकानंद कला वाणिज्य,
आयरे मार्ग, दत्तनगर, रात्र महाविद्यालय,
डोंबिवली

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# तियान्ची तलाव

*डॉ. आगरकर यांच्या प्रवाही शैलीतील हे पुढील प्रवासवर्णन. चित्रमयता हा त्यांच्या वर्णनातील विशेष भाग आहे - संपादक*

ऊरुम्ची येथील वास्तव्यात तिवान्ची तलावाला (Tian Chi Lake) भेट देण्याचा योग आला. विज्ञान प्रदर्शनाच्या कामातून वेळ काढून या तलावाला भेट देण्यासाठी अर्धा दिवस राखून ठेवण्यात आला. विज्ञान प्रदर्शनाचे काम त्या दिवशी सकाळच्या सत्रातच आटोपण्यात आले. दुपारच्या जेवणानंतर आमच्या सहलीला सुरुवात झाली. ऊरुम्ची शहरात सर्वत्र हिरवळ आहे. मोठमोठी झाडे आणि फुलांच्या बागा सर्वत्र आढळतात. परंतु जसजसे आपण गावाच्या बाहेर पडतो तसतशी झाडी विरळ होत जाते. थोड्याच वेळाच्या प्रवासानंतर आपण वाळवंटातच प्रवेश करतो. सर्वत्र रेतीचे साम्राज्य. अशा जमिनीत देखील रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावण्याचे काम सुरू आहे. या झाडांना पाणी पुरविण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतींचा उपयोग करण्यात आलेला आहे. काही वर्षानंतर ही झाडे वाढली की रस्त्याच्या बाजूचे चित्र पूर्णपणे पालटलेले असेल.

साधारणपणे १५ मिनिटांच्या प्रवासानंतर एक गाव आणि तेथील सिमेंट कारखाना नजरेस पडतो. गावातील घरे दगडाची असून त्यावर पत्र्याचे छप्पर बसवलेले आढळते. सिमेंट कारखान्याच्या आजूबाजूची घरे जरा चांगली असून, ती सगळी सिमेंटने बांधलेली आहेत. सिमेंटचा कारखाना मागे पडताच आमच्या बसने मुख्य रस्ता सोडून लहानशी वाट धरली. या रस्त्याला वळल्याबरोबर आजूबाजूचे चित्र एकदम पालटते. वाळवंट मागे पडून आपण दुतर्फा मोठमोठी झाडे असलेल्या वाटेने प्रवास करू लागतो. त्यामुळे जवळच पाण्याचा साठा असल्याची कल्पना येते. थोड्याच अवधीनंतर खळाळून वाहणारा ओढा आपल्या नजरेस पडतो. या ओढ्याच्या किनाऱ्याने जाणाऱ्या नागमोडी रस्त्याने बसचा प्रवास सुरू होतो. पुढे पाहावे तर मोठी टेकडी दृष्टीस पडते. टेकडीवर अनेक प्रकारची झाडे असल्याने ती हिरवीगार दिसते. वाळवंटातून प्रवास करून आल्याने हिरव्या टेकडीचे दर्शन फारच आल्हाददायक वाटते. नागमोडी वळणे घेत बस टेकडीवर चढते. आपण जसे वर जातो तसे डोंगरावरील झाडे स्पष्ट दिसू लागतात. त्यात सुरूच्या झाडांचे प्रमाण खूप असल्याचे लक्षात येते. हिवाळ्यात या परिसरात खूप थंडी पडते. त्यावेळेस डोंगरावर बर्फ पडतो. या बर्फमय वातावरणाला अनुकूल अशीच झाडे या डोंगरावर वाढतात. हिमालयात उंच ठिकाणी अशाच प्रकारची झाडे आहेत. त्यांचा आकार निमुळता असल्याने वरच्या टोकावर पडलेले बर्फ सहज खाली घसरून जाते.

तियान्ची तलाव हे ऊरुम्ची शहराजवळील एक अतिशय महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ आहे. या स्थळाला पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात. त्यांच्या सोयीसाठी तळापासून वर जाण्यासाठी रोप वेची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी अर्थातच शुल्क भरावे लागते. रोप वेच्या पाळण्यात बसून पर्यटक तलावापर्यंत पोहोचतात. आमच्यापैकी अनेकांना या पाळण्यात बसण्याची इच्छा होती. परंतु आमच्या चालकांनी आपली बस वरपर्यंत न्यायचे ठरविल्यामुळे आम्हाला पाळण्यात बसण्याची संधी मिळाली नाही. ही संधी जरी हुकली तरी रोप वेचे पाळणे जवळून पाहण्याची संधी आम्हाला मिळाली. त्याचबरोबर डोंगरातून जाणाऱ्या वळणावळणाच्या रस्त्याने प्रवास करण्याचा आनंद आम्हाला घेता आला. साधारणपणे ५०

मिनिटांच्या प्रवासानंतर आम्ही तियान्ची तलावाजवळ पोहोचलो. प्रवास फारच सुखाचा झाला. हॉटेलपासून तलावापर्यंत रस्ता सुंदर होता. कुठेही खड्डा नाही की खडबडीतपणा नाही. त्याच्या जोडीला सुंदर शॉक ॲब्सॉर्बर असलेली बस. बस तर वातानुकुलीत होतीच. त्याचबरोबर बसण्याची आसने वाकवून आरामात बसण्याची सोय होती. त्यामुळे प्रवास केल्याचा थकवा मुळीच जाणवला नाही. प्रसन्न मनाने आम्ही बसच्या बाहेर पडलो.

बसच्या बाहेर पडताच आमची प्रसन्नता आणखी दुणावली. याचे कारण तलावाशेजारचे प्रसन्न वातावरण आणि गार वारा. समुद्रावरून जसा वारा येतो तसाच तलावावरून वारा वाहतो. त्यामुळे प्रसन्न वाटते. वाळवंटातून आल्यानंतर तर वातावरणातील हा बदल खूपच आल्हाददायक वाटतो. तलावाकडे पाहताक्षणीच त्याच्या भव्यतेची कल्पना येते. साधारपणे १५० एकर एवढा भाग तलावाने व्यापला असावा. हा नैसर्गिकपणे तयार झालेला तलाव आहे. त्याच्या सर्व बाजू डोंगरांनी वेढलेल्या आहेत. डोंगरावर पडलेला पाऊस या तलावात जमा होतो. त्याचबरोबर हिवाळ्यात पडलेला बर्फ वितळून तलावात पाणी जमा होत जाते. त्यामुळे वर्षभर तलावात पाणी असते. तलावाची भव्यता पाहून त्यातून फेरफटका मारण्याची इच्छा आमच्या मनात आली. आमची इच्छा लवकरच पूर्ण झाली. आमच्या आयोजकांनी एक सुंदर बोट भाड्याने ठरविली. सर्वजण आधी आपापल्या खुर्चीवर जाऊन बसलो. प्रत्येकासाठी एका पाकीटात खाण्याचे पदार्थ ठेवले होते. ते संपेपर्यंतच लोक जागेवर बसले. त्यानंतर लोक उठून बोटीच्या वरच्या मजल्यावर गेले. काहीजण बोटीच्या कठड्याला धरून तलावाचे निरीक्षण करू लागले. बोटीवर लवकरच फोटो सेशन सुरू झाला. कोणी समोर दिसणाऱ्या दृश्याचे चित्रण करीत होते तर कुणी या पार्श्वभूमीवर आपल्या प्रिय व्यक्तीचे चित्रण करण्यात गर्क झाले.



**तियान्ची तलावा शेजारील वनस्पती**

पर्यटकांच्या मनोरंजनासाठी बोटीवर गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बोटीवरील गाईड तलावाबद्दल आणि तलावाच्या आजूबाजूला असणाऱ्या परिसराबद्दल माहिती सांगत असे. ही माहिती देणारी मुलगी मधे मधे गाणाऱ्याकडे वळत असे. तिच्या सूचनेवरून दोन वेगवेगळे गायक आपले गाणे सादर करीत असत. त्यांनी वापरलेले वाद्य जरा परिचयाचे वाटले म्हणून जवळ जाऊन पाहिले तर ते सारंगीसारखे वाटले. गायकांनी असे सांगितलेदेखील की त्या वाद्याची निर्मिती भारतात झालेली आहे. याचाच अर्थ भारत आणि चीन या देशांमध्ये




**बोटीवरील संतुर वादन**

सांस्कृतिक देवाणघेवाण होत आलेली आहे. गाणे चिनी भाषेत असले तरी गाण्याची चाल मात्र परिचयाची वाटत

होती. दोन वेगवेगळ्या भाषेतील संगीतात एवढे साम्य असल्याचे पाहून जरा आश्चर्यच वाटले.

साधारणपणे तासाभराचा बोटीचा प्रवास करून आम्ही बाहेर पडलो. बोटीत जाण्यापूर्वीच आम्ही पाहिले होते की तलावाच्या किनाऱ्यावर रंगीबेरंगी गणवेश भाड्याने देण्याऱ्या काही स्त्रिया आपली दुकाने थाटून बसलेल्या होत्या. बोटीचा प्रवास झाल्यावर हा गणवेश घ्यायचा असे आम्ही ठरविले होते. चीनमध्ये अनेक आदिवासी गट आहेत. त्यातील युगूर या आदिवासी गटाचा पारंपारिक पोशाख या स्त्रिया पुरवित होत्या. त्यात स्त्रियांसाठी तसेच पुरुषांसाठी गणवेश होते. आमच्या बरोबर असलेल्या अनेक जणांनी गणवेश परिधान केला. सगळ्यात जास्त मजा केली



**पारंपारिक गणवेशातील भारतीय विद्यार्थी**

ती थायलंडच्या मुलींनी. आशियाई विद्यार्थ्यांबरोबरच युरोपियन विद्यार्थ्यांनी देखील गणवेश परिधान करून आपली छायाचित्रे काढून घेतली. छायाचित्र काढून घेण्याचे हे काम बराच वेळ चालले.

त्यानंतर सर्व पर्यटकांनी आपला मोर्चा शेजारीच असलेल्या दुकानाकडे वळवला. तेथे विविध आदिवासी गटांच्या टोप्या उपलब्ध होत्या. तसेच दगडापासून बनवलेल्या अनेक वस्तू होत्या. आमच्यापैकी बऱ्याच जणांनी खरेदी केली. हे सगळे होईपर्यंत संध्याकाळ व्हायला आली. आता हॉटेलला परत गेले पाहिजे असे आमच्या गाईडने सांगितले. त्यानुसार सर्वांनी बसमध्ये आपापली जागा पकडली. थकून गेल्यामुळे बऱ्याच जणांना परतीच्या प्रवासात डुलकी लागली. मी मात्र पहिल्या सीटवर बसून फोटो काढीत होतो. तियान्ची तलावाला दिलेली भेट अनेक वर्षे स्मरणात राहील अशीच होती.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

---

(पृष्ठ ८ वरून)
मकरसंक्रात

साडीचा काळा रंग घेण्याचे कारण काळा रंग हा जास्त उष्णता शोषून घेणारा रंग असल्यामुळे थंडीपासून सरंक्षण मिळते. तसेच, काळ्या साडीवर हलव्याचे पांढरेशुभ्र दागिने खूलून दिसतातच पण त्यामुळे स्त्रियांच्या अंगी असलेल्या कलाकुसरीला योग्य वाव मिळतो. तसेच त्या दिवशी स्त्रियांना सुगडाचे वाण देण्याची प्रथा आहे. हा सुभट शब्दाचा अपभ्रंश आहे. हे पृथ्वीला दान आहे. त्या सुगडामध्ये बोरे, गाजरे, ऊस घालून त्या त्या वस्तूचे आरोग्यविषयक महत्व जाणवून दिले आहे. मकरसंक्रातीच्या प्रथेमागे गोरगरीबांना दान देण्याच्या प्रवृत्तीचा विचार होतो. तसेच सर्व स्त्रियांच्या या हळदीकूंकू करण्याच्या निमित्ताने एकत्र येण्याने परस्पर परिचय होऊन विचारांची देवाणघेवाण होते व त्यामुळे सामाजिक जाणीवांचा प्रत्यय येतो.

**सौ. मालती देवधर**
प्रशांतनगर, नौपाडा, ठाणे (प)
दूरध्वनी :२५४०३४६०

पुस्तक परिचय

# ।। अभंग संजीवन ।।

*श्रीसंत मामासाहेब देशपांडे यांच्या अभंग संजीवन पुस्तकाचा हा परिचय. यात मामासाहेबांच्या संतकृपा मध्ये आलेल्या ज्ञानेश्वर माऊलींच्या अभंगावरील निरुपणांचा संग्रह आहे - संपादक*

प्रवचन करताना मामासाहेब देशपांडे व मागे ज्ञानेश्वर माऊली असे मुखपृष्ठावरील छायाचित्र व मलपृष्ठावर वर मंदिर व खाली ''मोगरा फुलला, फुले वेचिता बहरू कळियासी आला'' असे फुललेल्या मोगऱ्याचे व फुलायला आलेल्या कळ्यांचे फारच मोहक रंगीत चित्र आहे. फारच वेधक नि बहारदार.

आतील पानावर ध्यानस्थ ज्ञानेश्वर, समोर ज्ञानेश्वरी नि मागे विठोबा रखुमाई असे चित्र आहे. श्रीसंत सद्‌गुरू ज्ञानेश्वर महाराजांच्या निवडक सोळा अभंगांचे रसाळ आणि मार्मिक निरूपण यात आहे. हा श्रीपाद वाक्‌सुधा खंड २, विभाग २ आहे. ज्ञानेश्वर महाराजांनाच पुस्तक अर्पण केले आहे. श्री वामनराज प्रकाशनने अतिशय सुबक नि सुंदर स्वरूपात ते काढले आहे. या प्रकाशनाचे हे १४० वे पुस्तक आहे. गुरुपौर्णिमेला २००६ ला हे प्रकाशित झाले आहे.

प.पू. सद्‌गुरु श्री मामांची श्री ज्ञानदेवी आणि संतसाहित्यावर त्यांच्या अवतार कार्यात हजारो प्रवचने नि शेकडो कीर्तने झाली पण लिखित किंवा ध्वनिमुद्रित स्वरूपात आज उपलब्ध नाहीत. त्यामुळे फार मोठ्या अलौकिक, अपूर्व अशा ठेव्याला आपण कायमचे मुकलो आहोत. पण जेवढा काही ठेवा हाती लागला तो वाचकांपुढे ठेवीत आहे अशी प्रकाशकाने आपली भूमिका मांडली आहे.

मामांनी १९७६ साली 'संतकृपा' मासिक काढले. त्या मासिकातले ८२-८३ सालातले हे लेख आहेत. हे सर्वच सोळा अभंग अत्यंत गूढ, सांकेतिक आणि निरूपणकाराची सानुभव अध्यात्मिक चिंतन खोलीची परीक्षाच घेणारे आहेत. हा 'सद्‌गुरू प्रसाद' अवीट गोडीचा व अद्‌भूत आहे. 'अभंग चिंतनाची' एक अनोखी वाट वाचकांना यातून सापडू शकेल. प्रत्येकाच्या कुवतीप्रमाणे ज्याच्या जे हाती लागेल ते सुखशांती व प्रसन्नता देणारेच असेल, साध्या सोप्या रसाळ भाषेत हसतखेळत घरगुती घटनांचे दाखले देत त्यांच्या त्यांच्या निरुपणाचा गंगाप्रवाह श्रोत्यांना पावन करत दोहो काठांनी तुडुंब भरून वाहत निघत असे. तो प्रत्यक्ष 'श्रवणानुभव' मोठा विलक्षण होता. ज्यांनी तो घेतला ते धन्य होत.

'सायखडियाचें बिक' या दुसऱ्या लेखातील या काही सुंदर ओव्या ज्ञानेश्वरीतील तेराव्या अध्यायातल्या पुढे आल्या आहेत.

श्रीगुरु हे त्यांच्या सद्‌गुरुंनी दाखवलेल्या मार्गाने सुषुम्ननाडीद्वारा जाऊन; म्हणजेच त्या मार्गाचे जतन करून; त्या परब्रह्माचा अनुभव घेतात व इतरांना 'सहजें ब्रह्मरसाचें परगुणें। केलें अर्जुनालगीं नारायणे।' (ज्ञाने. ६.०.२) असा त्याचा स्वकृपेकरून लाभ करून देतात.

याच आशयावर माऊलींची एक सुंदर ओवी ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात आहे -

श्रीगुरूचे उशिटे। लाहे जें अवचटें।
तैं तेणें लाभें विटे। समाधीसी॥ ज्ञाने. १३.७.४५०

'श्री गुरुचें उशिटें' म्हणजे काय? तर श्रीगुरुंना प्राप्त झालेली शक्ती. ती त्यांना कोणी दिली? त्यांच्या श्रीगुरुंनी! असे स्वतंत्र नव्हे, पण परंपरेने आलेले ज्ञान! त्यालाच 'उशिटें' असे म्हटलेले आहे.

ज्या परमात्म्याचे ज्ञान करून घ्यावयाचे, त्याच्यासंबंधी खुलासा माऊली चौथ्या कडव्याच्या पूर्वार्धात करतात;

निराकार अलिप्त वसे। शरीरीं असतुचि नसे।

परमात्मा निर्गुण - निराकार असून तो या शरीरात असून नसल्यासारखा असतो त्यावर शरीराचा अगर वासनांचा परिणाम होत नाही. माऊली म्हणतात,

आता याज परतें उरलें नाहीं काहीं।
देहीच विदेही होऊनि ठेले॥ ज्ञा. गा. ७२३.१॥

श्री संत तुकाराम महाराज देखील म्हणतात की,

आतां हें सोवळें झालें त्रिभुवन।
विषम धोऊन सांडियेलें ॥ सं. तुका. ३६१०.२॥

**एक चपखल दृष्टांत :**

याबद्दल माझी आई सांगायची ते उदाहरण मला उपयोगाला आले. ते असे की, सूर्याचे प्रतिबिंब पाण्यात पडते. पाणी हलविले की ते प्रतिबिंब हलते; किंवा तसे हलल्यासारखे भासते. पण वस्तुत: तसे नसते. ते पाण्यात भिजत नाही किंवा त्याबरोबर हलतही नाही. कारण पाण्याचा त्या प्रतिबिंबावर परिणाम होऊच शकत नाही. परंतु सूर्याच्या तापाने पाणी मात्र तापते. त्याप्रमाणे परमात्मा या शरीरात अलिप्त असा राहतो. त्याच्या सत्तेने हे शरीर चालते. आता त्याला काबूत कसे आणायचे? ते माऊली चौथ्या कडव्याच्या उत्तरार्धात सांगतात, ‘एकतत्व मनो-द्देशे। हृदयी ध्यावे। ॥४॥

या सर्वास कारण असलेले ते मन. या मनास बरोबर लगाम घालता आला; तर मग मन कितीही चपळ असो ते आवरता येते. जसे; अतिशय खट्याळ घोडे असले तरी ज्याची मांड पक्की, तो त्या घोड्याला नेमका वठणीवर आणू शकतो. त्याप्रमाणे जर केले नाही तर,

तेव्हा प्रत्याहारे ख्याती केली। विकारांची संपली बोहली।
इंद्रियें बांधोनि आणिलीं। हृदयाआंत॥
॥ ज्ञाने. ९.१४.२१५.॥

असा अनुभव येणार नाही. आता, या मनास आवरावयास काय करावे?

सोडी रसाची सोये। नको भुलो मायामोहें।

माऊलींनी यावर सहाव्या अध्यायात, एक बहारदार ओवी घातलेली आहे;

जो रसनेंद्रियाचा अंकिला। का निंद्रेसि जीवे विकला।
तो नाहीं एथ म्हणितला। अधिकारिया॥
ज्ञाने. ६.१६.३४५॥

जो रसनेचा अंकित झाला व निद्रेने ज्याच्यावर मात केली. तो हे करू शकणार नाही हे खरे, पण ज्याने रसना जिंकली, त्याने सर्वच जिंकले. कारण अन्नापासून मनाची उत्पत्ती आणि अन्न रसनेच्या ताब्यात असते. त्यामुळे त्यामुळे शरीराचे, मनाचे, बुद्धीचे आरोग्य वाढेल अशी सेवा केली की, आपोआप प्रत्याहार होईल व असा प्रत्याहार झाला म्हणजे काय? ते माऊली कडव्याच्या उत्तरार्धात काय सांगतात ते पहा -

समावी दोहतु जाणे। जीवन भातें॥ ५॥

**पान ४८ वरचे हे निरूपण पहा :**

ते प्रवचनाने लाभण्याजोगे नाही; न मेधेने, न पुष्कळ श्रवणाने; केवळ उपासना केल्यानेच ते प्राप्त होणार आहे. मग अशी उपासना घडण्यासाठी, आपण काय करावे? तर ‘सांडी माया मोह द्वंद्व दुराशा।’ तुला माया, मोह द्वंद्व हे सोडावे लागतील. तरच दुराशा चुकेल. नाहीतर नाही. यास्तव आशा समूळ खंडावी. याचे कारण आशा ही दु:ख वाढवते. म्हणजेच आशेने आशाच वाढते. याचाच अर्थ वैराग्याशिवाय सारेच व्यर्थ! त्यासाठी माऊली पुढील

चरणात सांगतात,

ज्यालागीं शिणसी ते तुजवी उदासा॥२॥

ज्या संसाराचा भार वाहताना तू शिणतोस, ज्याच्यासाठी तू राब राब राबतोस त्यांना मात्र त्याचे काही नसते. 'जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे।' (तु. गा. २९५६.१) कारण कुणी नव्हे कुणाचा सखा! ताई, माई, आक्का, भाऊ, काका कुणीही आपले नव्हेत. 'राहती निराळी। रांडापोरे सकळ॥ तु. ३११५.२॥' व हेच खरे आहे सर्वार्थाने.

हा देह सोडताना, ज्यांच्यासाठी तू कष्टलास ते सर्व दूर राहतात; हे पटले ना? आता त्याच्या पुढे जाऊन विचार कर की ज्या देहाचे चोचले आपण पुरवतो, ज्याला वैराग्याची शीव सुद्धा दाखवत नाही, ते शरीर तरी तुम्हाला साथ देते का? नाही. ते एकतर चितेत भस्म होते; अगर मातीत पुरल्यास माती होते; अथवा ते पशुपक्ष्यांनी खाल्यास त्याची विष्ठा बनते; परतु ते काही तुझ्याबरोबर येणार नाही. सर्वांत प्रिय जे शरीर. तेच जर तुझ्याबरोबर येऊ शकत नाही; तर इतर सारे कसे येणार? ती अपेक्षा तू का करावीस? या गोष्टीचा तू कधी विचार केलास का? तो तू करावास; म्हणून माऊली पुढील कडव्यात सांगताहेत की,

स्वप्नींचे धन ते धनची नव्हे।
मृगजळींचे जळ तें जळची नव्हे।
अभ्रींची छाया ते छायाची नव्हे।

येथे माऊली तीन उदाहरणे देतात. समजा; एका माणसाला स्वप्न पडले की, तो भूमी खणत असताना त्याला सुवर्णाचा हंडा सापडला; पण जागा झाल्यावर तो हंडा असतो का? नाही. मग बिचारा निराश होतो. तसेच दुपारची वेळ, ग्रीष्माचा उन्हाळा, सूर्यकिरणे जमिनीवर पडताहेत, तेथे पाण्याच्या लाटांवर लाटा उसळताना दिसताहेत; पण त्या जळाने खरीखुरी तहान भागू शकेल का? नाही ना! सूर्य कलताच त्या लाटा नाहीशा होणार नि तो जलाशयही! आता तिसरी गोष्ट घ्या. वर्षाऋतूचे दिवस. आकाशात अभ्रे आहेत. काय होते? धड छायाही नाही नि पावसाच्या पाण्याचा थेंबही नाही. काय पदरी पडले? निराशा!

ही उदाहरणे घेऊन, चवथ्या चरणात माऊली सांगतात की,

''तैसे विषयसूख, सुख नव्हे रया॥३॥

तसे, विषयसुख, हे खरे सुख देऊ शकत नाही. कारण ते नाशिवंत आहे. याचे कारण मोठे मजेदार आहे. विषय किती आहेत? तर पाच. या पाचांचिही मानवास इच्छा म्हणा, वासना म्हणा, कामना म्हणा ही असतेच. प्रत्येक एका विषयांपायी एकेक प्राणी मरत असतो; आणि आपण तर पाचही विषयात गुंत गुंतलेलो असल्याने, विषयांपायी आपण पक्के गुरफटून जाणार, मरणार पुन्हा जन्मणार, पुन्हा गुरफटणार, पुन्हा मरणार! आहे की नाही गंमत! माऊली म्हणतात की,

या पांचांही विषयीं। पाच मारिले सरती॥
निर्धारूनी पाहतां पांचही तुजपाशी।

मग तूच सांग पाहू. हे पाच विषय तुला कशी बरे चांगली फळे देतील?

तुज केवीं निकें होईल रया॥४॥

सामान्य माणुस चुकीच्याच कल्पना करतो, उराशी बाळगतो.

उपजताचि देह मृत्यूच्या तोंडी।
मी माझे म्हणतां न लाजसी रया।
शरण जाई त्या निवृत्ती तो तारील संसृति।
बाप रखुमादेविवर विठ्ठलाचिये भक्ति रया॥६॥

देह उपजला रे उपजला की, त्याच्यावर काळाची

सत्ता चालू होते. त्याच्या मनात येईल त्याक्षणी तो देह घेऊन जाईल. असे असताना, आपण मात्र 'मी म्हणजे देह' असे निर्धास्तपणे म्हणत असतो नि त्यावर अवलंबून राहत असतो. हे निखालस चूक नाही का? असे का बरे करता? कल्पनेने घरे का बांधता? असे करू नका. मी सांगतो ते जर ऐकाल, त्याप्रमाणे जर वागाल; तरच वाचाल! काय करायचे?

मामा साहेबांच्या निरुपणात गुंग झालात ना! मग काय करायचे? ते 'अभंग संजीवन' या त्यांच्या पुस्तकात प्रत्यक्षच वाचा. ही नुसती झलक दाखवलीय. तुम्ही स्वत: या ज्ञानगंगेत डूब घ्या, डुंबा नि परमार्थाच्या 'संगा' लागा.

**अभंग संजीवन**
प.पू. श्री.श्री.द (मामासाहेब) देशपांडे
पृष्ठे - १९२ मूल्य - ९० रु.
॥ श्री वामनराज प्रकाशन ॥
'श्रीगुरुकृपा', आनंद नगर, हिंगणे खुर्द,
सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०५१

**आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

## कृत्रिम प्रथिनांची निर्मिती

साऱ्या जीव सृष्टीला प्रथिने (प्रोटिन्स) फार महत्त्वाचे असतात. कारण ते शरीराची जडण घडण करतात. विकर तयार करतात, संप्रेरके तयार करतात. त्यामुळे प्रथिनांचा अभ्यास जरुरीचा ठरतो. अमेरिकेमधल्या शास्त्राज्ञांनी कृत्रिम प्रथिन रेणू तयार करण्यात यश मिळवले आहे.

प्रथिनांची रचना वीस मूलभूत अमायनो आम्लांपासून होते. ही आम्ले एकत्र जोडून साखळी तयार होते, यालाच प्रथिन असे म्हणतात. लहान जागेत हा रेणू मावण्यासाठी त्याच्या साखळीच्या घड्या पडतात. त्यातील विद्युतभारीत भाग बाहेरच्या बाजूला असल्यामुळे सभोवताल्या द्रवाशी त्यांचा संपर्क येतो. प्रथिनांमध्ये नेमकी कोणती आम्ले आहेत आणि ती कोणत्या क्रमाने जोडली जातात हे शास्त्रज्ञांना ज्ञात आहे. तरीसुद्धा त्यांना प्रथिनाच्या रेणूत अमिनो आम्लांच्या घड्या व वळणे कशी पडतात हे माहीत नव्हते. थोडक्यात प्रथिनांची आंतर्गत रचना माहीत नव्हती. संगणकाच्या सहाय्याने शास्त्रज्ञांनी अमिनो आम्लांच्या साखळीच्या घड्या कशा पडतात, त्यात वळणे कशी असतात हे शोधून काढले. थोडक्यात, त्यांना प्रथिनांचे अंतरंग आणि त्यांचा आकार कळून चुकला.

संगणकाने दिलेल्या माहितीनुसार संशोधकांनी २८ अमायनो आम्ले असलेला प्रथिन कशा प्रकारे गुंफला गेला असेल हे पाहिले. तेव्हा ही गुंफण $१०^{२७}$ (दहाचा सत्ताविसावा घात) प्रकाराने करता येते असे दिसून आले. मग शास्त्रज्ञांनी ''झिंक फिंगर'' प्रकारचा आकार असलेला प्रथिन निवडला. त्यानुसार प्रयोग शाळेत त्यांनी अमायनो आम्ले जोडली आणि पहिला कृत्रिम प्रथिन तयार केला. यामुळे अधिक परिणामकारक औषधे तयार करता येणे शक्य आहे. कृत्रिम प्रथिन निर्मिती हे फार महत्त्वाचे संशोधन ठरणार आहे.

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*भारतीय संस्कृतीचे अलौकिक व दिव्य वैशिष्ट्य जपणे का आवश्यक आहे ह्यावरचे हे विचार - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील अंकात आपण **भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य कोणते हे पहाण्यासाठी श्रीमद्‌भागवतातील एक आधार सांगितला होता. भारतात जन्म होणे हा** कांही **एक नशीबाच्या फाशांचा खेळ म्हणजे ''चान्स हॅपनिंग'' नव्हे, तर ही एक परमेश्वरी 'योजना' व 'आशीर्वाद' व प्रसाद आहे असे पाहिले!**

मला कल्पना आहे की, या विधानावर, 'इंग्रजी शिक्षण न पाश्चात्य तत्वज्ञानांच्या व संस्कृतींच्या मुशींतून व मार्क्सिस्ट भौतिकवादी तत्वज्ञानाची सांवली पडलेल्या विद्वांनांच्या भूंवया उंचावतील, तसेच, भौतिकवादी वैज्ञानिक सुद्धा आव्हानात्मक भूमिका घेतील व पुरावे मागतील.

पण, ही '**जन्मसंकल्पना**' मान्य नसेल तर दोन मुद्दे उपस्थित होतात की 'जन्म' ही एक Statistical Mathematical Probalbility 'स्टॅटिस्टिकल प्रॉबेबिलीटी' आहे असे सिद्ध करणारे विरूद्ध बाजूकडे पुरावे आहेत कां?

दुसरा मुद्दा आहे की, 'जीवनाच्या सातत्यात', ह्या पृथ्वीवरील भूपृष्ठावर निरनिराळ्या संस्कृतींचा जो प्रवाह काही पिढ्यान पिढ्या चाललेला, इतिहासांत नमूद झाला आहे त्याचे कारण काय? ह्या संस्कृतीचा उगम, पसारा, विस्तार व गुणात्मक प्रगती कशी, कशामुळे होते?

रोमन, ग्रीक वगैरे अनेक संस्कृत्या नाहीशा झाल्या पण, भारतीय संस्कृतीचा प्रवाह सर्वात जुना व सातत्याने प्रवाहित आहे, एव्हढेंच नव्हे तर नजीकच्या 'काळातील वेदिक बीजांशी' ह्या संस्कृतीचा जो आधार दाखविता येतो व त्याचा एक विशिष्ट प्रभाव अनेक शतके सध्याच्या मानवाला माहीत असलेल्या इतिहासातील ज्ञानात आहे, त्याचे काय कारण व कोणते सामर्थ्य?

**डॉ. निहार रंजन राय :**

ह्या माझ्या विधानाला एक आणखी जोरदार पुरावा योगायोगाने माझ्या हातात आला.

डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या संग्रहातील एक पुस्तक म्हणजे काय तर एक ग्रंथच (६५६ पानांचा) माझ्या हातात दिला.

हा ग्रंथ आहे 'भारतीय संस्कृति' (1st Volume) (Published by Bharatiya Sanskriti Trust, 10, Jawaharlal Nehru Road, Calcutta - 700 013) Rs. 400/- for 2 Volumes) ह्यांत एकंदर ५२ विद्वानांचे लेख आहेत. डॉ. प्रभाकर माचवे हे संपादक आहेत व ९ जणांचे संपादक मंडळ आहे.

त्यांतील **(Dr. Nihar Ranjan Ray)डॉ. निहार रंजन राय यांचा (''Key Note & Essay'') ''आमुख - निबंध'' आहे.**

**''कृष्टि, कल्चर एवं संस्कृति''** हे शीर्षक असलेला हा लेख मूळ बंगला भाषेतील व या मजकूराचे श्री. छबिनाथ मिश्रा यांनी केलेला अनुवाद आहे, व तो हिंदीत आहे. (३१ पानी विस्तृत असा हा लेख आहे)

पण, ह्या लेखाचेही मूळ बीज वा आधार कोणता दिसला?

**तर पान १८ वर ते म्हणतात :**

''प्रारंभ में ही कहा गया है कि **संस्कृति शब्द** का प्राचीनतम उल्लेख **ऐतरेय ब्राम्हण** मे मिलता है; उस उद्धरण के भीतर ही रविन्द्रनाथ (टागोर) ने अपनी रूचि के अनुकूल अर्थ की खोज की है। उद्धरण प्रस्तुत है -

**''ॐ शिल्पानी शंसन्ति देव शिल्पानि।**

**एतेषां वै देव शिल्पानाम् अनुकृतीह शिल्पम् अधिगम्यने-**

**हस्ती कंसो वासो हिरण्यम् अध्वतररिथ: शिल्पम्। ---**

**आत्म संस्कृतिर्वान शिल्पानि।**

**छन्दोमयं वा एतैर्यजमान आत्मानं संस्करते।''---**

ध्यान देने योग्य है कि इसके बाद भी अंतिम वाक्य मे **सन्तान प्रजनन की क्रिया को भी शिल्प-कर्म कहा गया है जो अन्यान्य शिल्प की तरह ही छंन्दोमय होने के नाते आत्म संस्कार का अन्यतम उपाय है।**

**प्रजनन क्रिया एक शिल्प कर्म एवं आत्मसंस्कार का अनयतम उपाय है, ---''**

ह्याचा मतीतार्थ हा आहे कीं संस्कृतीचा हा मानवी जैविक खेळ हा 'जीवात्म्याशी' संबंधित आहे. जन्म होणे हीच मुळी एक '**शिल्पकर्म**' कृती आहे. **दैवीशिल्प कृति** आहे!! ही मूळ संकल्पना कुणाची? **माता पित्यांची की देवाची!!** म्हणून जन्म हा नुसता Physical शारीरीक व Biological गुष्क जीवानिर्मीती नसून ती एक 'संस्कारक्षम' शिल्पक्रिया आहे. ह्या क्रियेला म्हणूनच ''**देव-शिल्प**'' असे म्हणले जाते.

संस्कृति की कृष्टि? :

ह्या ३१ पानी लेखातील पहिली १८ पाने ही '**संस्कृति**' ह्या शब्दाच्या पाठीमागे नक्की कोणती संकल्पना आहे यावर खर्च केली आहेत.

बंगाली भाषेतील लिखाणात १९३२-३३ पासून १९३७-३८ पर्यंत 'संस्कृति' ह्या संकल्पनेलाच '**कृष्टि**' हा समानार्थी शब्द वापरला जात असे. ह्या 'कृष्टि' शब्दाला रविन्द्रनाथ टागोर यांची पूर्ण मान्यता नव्हती! पसंती नव्हती!! १९२२ मध्ये सुनीतीकुमार चट्टोपाध्याय ह्यांनी रविन्द्रनाथांचे लक्ष 'कृष्टि' या शब्दाकडे वेधले. पण, एरव्ही इंग्रजी शब्द 'कल्चर' (Culture) ह्या शब्दामूळे ज्या संकल्पनेचे रूप डोळ्यासमोर येते ते 'संस्कृति' ह्या शब्दाने साकारले जाते असा दृढ विश्वास होता (व तो आजही आहे).

'कृष्टि' या शब्दाच्या पेक्षा 'संस्कृति' या शब्दाला एक तऱ्हेचे 'गेय माधूर्य' आहे असे स्वभावत: वाटेल. पण डॉ. निहार रंजन राय यांना 'कृष्टि' या शब्दामागील एक विशेष गूढ, रहस्यात्मक व भारतीय संस्कृति व तत्त्वज्ञानातील एक किंवा त्याहिपेक्षा विश्वनिर्मिती व त्यातील संस्कारक्रियेची अनंतकाळ चालणारी संकल्पना डोळ्यासमोर आणावयाची इच्छा आहे. हे पूर्णपणे समजण्यासाठी हा मूळ लेख संपूर्णच वाचावयाला हवा. पण, तरीही मी थोड्या त्रोटक व सूत्र पद्धतीने तो इथे मांडणार आहे.

'**कृष्टि' शब्द वैदिक आहे**. कर्षण क्रिया, कर्षित क्षेत्र अथवा 'भूमि' ह्यांच्या अर्थसंकल्पना व Synibolism रूप सादृश्याशी संबंधित आहे. देश, देशांतील लोक व 'जाति' हे थोडे व्यावहारिक शब्द ही गोष्ट ध्वनित करतील. पण '**जाति**' ह्या शब्दाने सुद्धा एका अर्थाने जन्मजन्मांतरीच्या गुण, रूप, वर्ण वैशिष्ट्यांचा संदर्भ दर्शविला जातो. **'पंचकृष्टय: अर्थात पांच जाति** म्हणजे **'आर्य' ह्या वंशाच्या पांच मुख्य शाखा** जी **अनु, द्रहु, तुर्वस, यदु आणि पुरू वंशाचे लोक. (या संबंधात आणखी माहिती आमचे वैष्ण व धर्माचे व अध्यात्म विज्ञान केंद्राचे मुलूंडचे डॉ. धनंजय डोंगरे सांगतील. मस्त्य पुराणांत याची पूर्वपीठीका आहे.**

---

उपकाराची फेड अपकाराने करणे हे नीचपणाचे लक्षण असते.

ह्या संकल्पना आधुनिक विज्ञान शास्त्रातील शब्द विज्ञान किंवा भाषा विज्ञानात कितपत बसतील याबद्दल डॉ. निहाररंजन राय खात्री देऊ इच्छित नाहीत, पण त्यांच्या दृष्टिने, 'समाजशास्त्र' व 'जीवशास्त्र' ह्यांच्या संदर्भात, ह्या प्रश्नाला फार मोठे समर्थन प्राप्त आहे असे ते ठामपणे प्रतिपादन करतात. काय आहे हे समर्थन? याशिवाय, काय आहे त्यांचे महत्त्व, आपल्या मुख्य विषय, म्हणजे 'भारतीय संस्कृति, बीज, मॉडेल व साधना, ह्या विषयाला? तेच आता आपण पाहू या!!

**पुरुषसुक्त व संस्कार :**

**माझ्या स्वत:च्या मताने 'पुरुषसूक्त' या वेदिक सूक्तातील सृष्टिनिर्मीतीच्या काही मूलभूत संकल्पनांशी यांचा गूढ व रहस्यात्मक संबंध आहे. 'भूमि, क्षेत्र, बीज, संस्कार क्रिया, ऋतु, संवत्सर व यज्ञक्रिया** वगैरे.

**कृष्टि कर्म व संस्कार :**


**संकल्पना ह्या 'कृष्टि'च्या अर्थाशी जोडलेल्या आहेत.** स्वत: डॉ. राय म्हणतात -

''मनुष्य कृष्टि-कर्म क्यों करता है? कर्षण क्रिया अथवा भूमि जोतने का उद्देश्य क्या है? शस्त्र, अन्न, फल एवं फसल का उत्पादन करके जीविका - निर्वाह, क्षुधा शान्ति तथा जीवन रक्षा एवं संवृद्धि के लिये ऐसा करता है।''

आता माझ्या शब्दांत सांगावयाचे तर - एका बीजापासून अनेक बीजांची उत्पत्ति, भूमि, पाणी, वातावरण, सूर्यकिरण शक्ति यांच्या मदतीने सातत्याने होत रहाते. पण, हे झाले केवळ Multiplication of the Spacies म्हणजे त्या बीजाच्या जातीची संख्यात्मक वृद्धी व संवर्धन. पण, ह्या जीवनक्रमात गुणात्मक वृद्धि सुद्धा अभिप्रेत आहे. हे एक गुणात्मक परिवर्तन quantitative Transformation सुद्धा होत असते. ह्या बीजावरही ह्या संख्यात्मक वृद्धिसमवेत गुणात्मक - संस्कारात्मक क्रिया समांतर पद्धतीने किंवा जास्त सयुक्तिक - एकात्म पद्धतीनेच होत असतात.

एव्हढेच नव्हे तर ह्या गुणात्मक संस्काराचाच एक दूसरा भाग म्हणजे दुर्गुणांचा नाश किंवा 'विषस्य विषऔषधम्' सारख्या अपप्रवृत्ति व अपगूणांचा नाश ही अभिप्रेत असतो.

**ह्या सर्वकष गुणात्मक परिवर्तनाला संस्कृतिकरण म्हणता येईल.** ही क्रिया जशी वनस्पतीशास्त्रांत तपासली व पाहिली तशीच ती जीवशास्त्रात, समाजशास्त्रांतही '**Collative parallalism**' '**संदर्भात्मक समांतर तत्वा ने' होत असते** हे जाणून **हिंदूसमाजात '१६ संस्कार क्रियांची योजना केलेली दिसते.** स्वामी दयानंद यांनी ह्या क्रियांना पुनसज्जीवन दिले व संकल्पित शास्त्रोक्त बैठक प्राप्त करून दिली.




डॉ. निहार रंजन राय सांगतात की -

'' जन्म से मृत्यू तक मनुष्य को अपने जीवन के

प्रयोजन के लिए ही एक विरामहीन संस्कार प्रकियासे गुजरना पडता है। --- जब मनुष्य मातृगर्भ से 'भूमिष्ठ' होता है तब उस मानव शिशु में और पशुशावक मे कोई विशेष या अधिक अन्तर नहीं दिखता।

**कर्षण या कृषि का अन्यतम उद्देश्य है - बीज की उन्नति, संवर्धन या संस्कार साधन और उसकी शक्ति में वृद्धि करना। इस प्रसारित अर्थ मे जिस शब्द का प्रयोग किया जाता था, मेरा अनुमान है की वह शब्द 'संस्कृति' नही, बल्कि 'कृष्टि' था।**

लक्षात घ्या कीं सध्याच्या पाश्चात्य विज्ञान विश्वासात 'उत्क्रांति' म्हणजे Evolution ची संकल्पना फक्त Biological Physical ह्या वर निगडीत आहे. **पण, भारतीय किंवा वेदिक संस्कृतिमध्ये एक मूलभूत संकल्पना आहे की बदल हा 'आंतरिक गुणप्रवृत्तीमध्ये प्रथम होऊ घालतो व नंतरच त्याचे बाह्य शारिरीक किंवा मानसिक रूपांत स्थित्यंतर झाल्याचे दृष्टिस येते.** तेव्हा, बदल हा आंतून, अंतरंगातून बाहेर असा आहे.

पाश्चात्य संस्कृतीत ह्या बदलाचा एकांगी दृष्टिकोन आहे. ह्या बहीर्गत बदलाचे वर्णन व इतिहास कदाचित ते अत्यंत मेहनतीने मांडत असतील व ते कौतुकास्पद प्रयत्न जरूर आहेत, पण ह्या बदलाचे मूळ कारण व हेतू शोधण्यात ते व त्यांचे विज्ञान तोकडे किंवा असमर्थच आहे.

आता प्रश्न उपस्थित होतो की हा आतंरिक बदल घडवून आणण्याची क्रिया कुठे होते, कशी होते व त्या उत्क्रांती क्रियेला आधारभूत असे कोणते प्रवाह वा शक्तिस्त्रोत आहेत की त्यांच्या आवाहनाने, अस्तित्वाने व प्रभावाने हे बदल घडतात. शिवाय, ह्या बदलांची योजना व हेतू कोणता? बदल घडवून आणण्यापूर्वी किंवा होत असतानाही ह्या प्रश्नांचा उद्‌भव आवश्यक असावयाला हवा नाही कां? केवळ एखाद्या सट्टाबाजारांतील अनियंत्रित बदलामुळे जसा आर्थिक जगतात शोध व हैदोस माजू शकतो तसाच 'अज्ञानी मानवी प्रयत्नांमुळे हे संकट ओढवू शकते. पण, आपल्याला असे आठवेल की पाश्चात्य विज्ञानाचे प्रयोग ह्या अपूर्ण, तोकड्या व जुगारी पद्धतीच्या धर्तीवर एकांगी दृष्टिकोनांतून चालविले जात आहेत.

ह्या प्रयोगावर नियंत्रण नाही असलेच तर ते त्या त्या देशाच्या तितक्याच अज्ञानी राज्यकर्त्यांचे आहे व त्यांना सामान्य नागरिकांनी निर्माण केलेल्या संपत्ती Wealth ह्याचा मनमानी खर्च करण्याची मुभा राजकीय सत्तेच्या सामाजिक अधिकारांत बहाल केलेली आहे. हे अत्यंत धोकादायक परिस्थितीचे दर्शन आहे!!

पण, वस्तुस्थिती अशी आहे की ह्या 'अज्ञानी मानवी जुगारी वैज्ञानिक खेळांवरही निसर्गाची एक अंतिम नियंत्रण ठेवणारी सत्ता आहे. तिचा अंमल हा 'सत्य' व 'ऋत' ह्या चिरंतन तत्वावर आधारलेला आहे व जे मानवी विश्व व त्यातील अज्ञानी वैज्ञानिक स्वत:ला स्वायत्त सत्ता मानतात त्यांच्या जन्म, मरणावर व वैचारिक स्वातंत्र्यावरही ही स्पिरीच्यूअल सत्ता नियंत्रण ठेवते आहे. फक्त हे प्रचलित वैज्ञानिक ही सत्ता मानत नाहीत, बेदरकार आहेत व वैश्विक स्पिरीच्यूअल हा सत्तेच्या 'Road Map' किंवा ''दैवी नैसर्गिक प्रगतिक दिशेशी'' एक तऱ्हेचा व्यभिचारी व्यवहार करत आहेत. त्यांना ही वैश्विक सत्ता 'Mechanical' म्हणजे यांत्रिक Mechanical Naturalistic अशी वाटते किंवा तशीच ती असावी अशी स्वार्थी व अहंकारयुक्त भावना आहे.

पण, वैदिक व भारतीय संस्कृतित अशी कृत्रिम भावना नाही. ही वैश्विक स्पिरीच्यूअल यंत्रणा विचारशील, नैतिक व जीवसृष्टीशी 'माऊलीच्या नात्याने व अधिकाराने' बघत आहे व त्या जीवांची प्रगती व वाटचाल एका धोरणाने व सात्विक गुणात्मक ध्येयाने ती व्हावी ह्याबद्दल जाणीवपूर्वक कार्यरत आहे. अशी भावना आहे!! शिवाय, हे बदल ज्या आंतरिक प्रेरणा व शक्तीच्या योगाने होणार आहेत, त्यांत

जरी बहीगर्त चौकट वैश्विक असली, तरी, बदल करण्याचे ऐच्छिक स्वातंत्र्य हे त्या त्या वैयक्तिक जीवमात्राला एका मर्यादेत बहाल केलेले आहे व म्हणूनच, **'अर्जून' जेव्हा महाभारतातील गीता उपदेशाच्या अंतिम चरणांत भगवान कृष्णाला** प्रश्न विचारतो की, **''आता ह्या परम ज्ञानाच्या प्राप्तिनंतरही मी निर्णय कोणता घेऊ?'' त्यावर भगवान म्हणतात -**

**''इति ते ज्ञानभाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया।**
**विभृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरू ॥१८॥ ६३॥**

**ह्या श्लोकाचे लोकमान्य टिळक काय भाषांतर व टिका व भाष्य करतात ते महत्त्वाचे आहे.**

१८ (६३) ''याप्रमाणे गुह्यातले गुह्य असे हे ज्ञान तुला मी सांगितले. याचा पूर्ण विचार करून तुझ्या इच्छेला येईल ते कर.''

(''वरील श्लोकांत कर्मपारतंत्र्याचे जे गूढ सांगितले आहे त्याचा विचार गीतेच्या १० व्या प्रकरणात सविस्तर केलेला आहे तो पहा.)

६३ व्या श्लोकांत **''तुझ्या इच्छेस येईल ते कर''** असे भगवंतानी म्हटले आहे खरे; पण त्याचा **अर्थ फार खोल आहे.** ज्ञानाने किंवा भक्तीने **बुद्धी 'साम्यावस्थेस' पोंचली म्हणजे वाईट इच्छाच शिल्लक रहात नसल्यामुळे अशा ज्ञानी पुरयाचे 'इच्छास्वातंत्र्य' त्यास किंवा जगास कधीच अपायकारक होऊ शकत नाही. म्हणून हे ज्ञान तू समजून घेतलेस (विगृश्य) म्हणजे तू स्वयंप्रकााी होशील, व नंतर (आधी नव्हे) तूं स्वेच्छेने जे कर्म करशील तेंच धर्म्य व प्रमाण होईल; आणि अशा प्रकारची स्थितप्रज्ञाची अवस्था तुला प्राप्त झाल्यावर तुझ्या इच्छेला आळा घालण्याची जरूरी रहाणार नाही.'' असा त्यातील 'भावार्थ' आहे.**

थोड्या फरकाने, **मला मात्र असे वाटते कीं, ह्या 'रूध्द' अर्थ असा भावार्थ न घेता तो 'योगिक' अर्थ घ्यावा. याचा मतीतार्थ असा की ही ज्ञानाची 'साम्यावस्था' (ऋग्वेद, यजूर्वेद, सामवेद) ह्या सोपात संकल्पनेने एकदम प्राप्त होत असताना दिसत नाही. पण, ह्या ज्ञानाच्या साम्यावस्थेकडे जाण्याचा एक सोपान मार्ग आहे त्यावर समाजाची व्यक्तिगत व समष्टिगत अशी संयुक्त वाटचाल चालू आहे. त्याची 'प्रयोग शाळा ही पृथ्वी आहे.' त्याला एका जन्म मरण पुनर्जन्म ह्यांची साखळी योजना आहे आणि ह्या 'प्रकृति नियंत्रित' यंत्रणेच्या धारण व धोरणावर आधारलेली प्रगती ही 'संस्कार क्रियेत व आधारून' सतत व कदाचित अनंतकाळ चालू रहाणार आहे.**

पण, त्याचे एक अंतिम दृश्य भगवान कृष्ण सांगत आहेत आणि त्यांत अगोदरच 'मानवी इच्छा स्वातंत्र्याच्या मर्यादा प्रवत्ती ह्यांचे ज्ञान आगाऊच देऊ केलेले आहे.

शिवाय या संस्कारक्रियांची यंत्रणा ह्या दैवीसंपदायुक्त भारत भूमीवर रचण्यात आली आहे व तिचा भार व रचना ह्या पवित्र भारतभूवर जन्म घेणाऱ्या जीवात्म्यांना एका सांस्कृतिक वारसा व जन्मांतरीच्या संस्कार क्रियेने प्राप्त होत आहे - सातत्याने होत राहिली आहे!! ही 'संस्कार क्रिया' संस्कृतीची बैठक व वाटचाल योग्य मार्गाने होण्याची हमी आहे. मूलभूत आधार आहे.

पण, काळाच्या ओघांत त्यांत जे गुणात्मकतेमध्ये 'अशास्त्रीय हिणकसपणाचे' दोष प्राप्त झालेले आहेत व त्याच्या ज्या बाह्यत्कारी 'शुष्क-निर्जीव'- संस्कारक्रियांच्या रचना व स्वरूपे समाज मृत सांगाड्यांच्या स्वरूपात संभाळत आहे, निष्प्राण स्वरूपात जतन करत आहे, त्यांत 'प्राण प्रतिष्ठा' नव्या जोमाने व पूर्ण ज्ञानाने होण्याची नितांत आवश्यकता आहे!!

**दैशिक शास्त्र व संस्कार क्रिया :**

ह्या 'संस्कार क्रियांचे' मूलभूत वर्णन मला 'दैशिक शास्त्र' ह्या श्री १०८ सोंबारी महाराज ह्यांच्या भाष्यात सांपडेल. पण, हे भाष्य मूळ स्वरूपांत उपलब्ध नाही तर कै. बद्रीप्रसाद टुलधारिया यांच्या ग्रंथात मिळते. त्याचे नागपूरचे ख्यातनाम विद्वान प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी स्वैर अनुवाद, संदर्भ, टीपा व सविस्तर विवेचक प्रस्तावने सकट केलेल्या पुस्तकांत मिळाले. कै. पं. दीनदयाल उपाध्याय यांनी एकात्म मानववादाचे प्रतिपादन करताना या ग्रंथाचा आधार घेतला होता. 'ह्या ग्रंथावर' लोकमान्य टिळक ह्यांनी खालील अभिप्राय दिला होता -

''मी आपले दैशिक शास्त्र फार आनंदाने वाचले. माझे मन तंतोतंत तुमच्या मताप्रमाणेच आहे आणि हे मत तुम्ही अत्यंत समर्थपणे प्रतिपादन केले आहे.''

हे एव्हढे विस्तृत वर्णन मध्येच कां सांगतो आहे? कारण, 'अधिजनन' ह्या प्रथम आन्हिकात ह्या 'दैशिक शास्त्रात' 'संस्कार' क्रियांची सगळी जातकुळी, वर्गवारी व प्रयोजन एका वैदिक आध्यात्मिक पातळीच्या बैठकीवर समाधानकारक रीत्या केलेली आढळेल.

मनुष्य संस्कारमय असतो म्हणजे ज्याचे जसे संस्कार असतात तसा तो आपोआप बनतो. त्यात शेषमात्रही न्यूनाधिक होत नाही.

**संस्कार चार प्रकारचे असतात :**

१) जन्मांतर २) सहज

३) कृत्रिम ४) अन्वयागत

इथे अधिक खोलात न शिरता पुन्हा आपल्या मूळ विषयाकडे जावयाला हवे.

आपण, इथे थोडा अर्धविराम घेऊन ही 'देवशिल्प क्रिया' व 'मानुषशिल्प क्रिया' कशी होते व त्यात भारतीय वेदिक संस्कृतीची छाप कशी आहे हे सविस्तरपणे पाहू या.

॥ कृष्णार्पणमस्तु ॥

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
E mail;: yrsane@eth.net

●●●

भारतातील सर्व कलांच्या निर्मितीला धर्माचे अधिष्ठान आहे.

नागरी जीवनातील सर्व कलांचे प्रदर्शन करण्याची एकमेव वास्तू म्हणून मंदिर हे केंद्रस्थानी होते. कलाकार, संगीतकार, वादक, शिल्पकार, नृत्यकार, कीर्तनकार – सर्वजण आपली कला, आपली विद्या ईश्वरचरणी अर्पण करण्यात धन्यता मानत असत. सर्व प्रकारचे सण – उत्सव साजरे करण्यासाठी नागरिक मंदिरात एकत्र येत असतात. मंदिर हे प्राचीन भारतीय नागरजनांच्या परस्पर संपर्काचे परस्परसंवादाचे मध्यवर्ती केंद्र होते.

मंदिराची संकल्पना ही पर्वताच्या उंचीतून उत्क्रांत झाली असावी. शिखर, कळस, आमलक हे मंदिराचे वास्तुघटक पर्वतशिखराशी मिळते जुळते वाटतात.

भारतीय नगररचनेत देवमंदिरे विशिष्ट जागी असावीत असा उल्लेख सापडतो.

# बोरकरांची काव्यनिर्मिति - एक आध्यात्मिक साधना

*बा. भ. बोरकरांच्या कवितांचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर त्यांच्या आध्यात्मिक साधनेची प्रचीती येते. या लेखात या दृष्टीने घेतलेला एक शोध - संपादक*

१९७० साली मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाच्या २० व्या अधिवेशनात आपल्या अध्यक्षीय भाषणांत कविवर्य बोरकर म्हणाले होते-

''काव्य ही आध्यात्मिक साधना आहे. आत्मविद्येचा हा एक आगळा व लोभसवाणा आविष्कार आहे. लययोगाची ही एक हृदयंगम कला आहे असे ज्यांनी मनापासून मानले आणि या साधनेची वाट जे शोधीत, चोखाळत राहिले ते संत झाले आणि ज्यांनी काव्यकला हा एक षौक मानला किंवा छंद मानला ते कवीच राहिले किंवा कवी म्हणूनही फार लवकर संपले असे तुम्हाला आढळून येईल.''(१)

हे भाषण आणि त्यांतील बोरकरांचे विचार जेव्हा मी प्रथम वाचले तेव्हा मी काहींसा विचारात पडलो. तसं पाहिलं तर सर्वसामान्य रसिक बोरकरांना ओळखतो तो एक प्रेमकवी म्हणून, निसर्गकवी म्हणून आणि त्यामुळे 'दिव्यत्वाची जेथं प्रचिति, तेथे कर माझे जुळती' या काव्यरचनेनं साऱ्या महाराष्ट्रात प्रसिद्धी पावलेल्या बोरकरांच नाव घेतल की या रसिकांना प्रथम आठवतं ते 'सरीवर सरी आल्या गं,' 'माझ्या गोव्याच्या भूमीत गड्या नारळ मधाचे,' मोहक अशी 'पाठमोरी पौर्णिमा' अथवा धुंद करणारी बेधुंद 'जपानी रमलाची रात्र.'

मी मात्र बोरकरांच्या प्रेमात पडलो होतो तो त्यांच्या आध्यात्मिक रचना वाचूनच. आध्यत्मिकतेकडे झालेली त्यांची वाटचालही मला ठाऊक होती, अनेक समीक्षकांनी रविन्द्र-अरविंदाच्या मार्गावरील एक पथिक म्हणूनही त्यांचा उल्लेख केला होता. पूजा-अर्चे सारख्या बाह्य उपचारांपासून ते दूर होते हेही मला ठाऊ होतं आणि म्हणूनच बोरकरांच्या साधनेचं स्वरुप जाणण्याचं कुतुहल माझ्या मनात कायमचं घर करुन राहिलं होतं.

या भाषणांत बोरकरांनी काव्यनिर्मितीमधील दोन प्रवाहांचा उल्लेख केला आहे. त्यांतील एक प्रवाह या निर्मितील षौक अथवा छंद मानतो. आणि त्यामुळे ज्याप्रमाणे आपली बाह्येन्द्रिये भौतिक सुखाच्या छंदापायी लवकरच थकुन, कंटाळून जातात, त्याचप्रमाणे कोणतेही उदात्त उद्दिष्ट नसल्यामुळे निर्मितीचा हा झराही आटू लागतो.

याउलट दुसरा प्रवाह मात्र या निर्मितीच्या लयमग्नतेतून आत्मज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. ती साधना अखंड चालते व असे कवि संतही होतात असे बोरकर निक्षून सांगतात. बोरकर हे दुसऱ्या प्रवाहातील एक पथिक होते हे उघडच आहे. परंतु आपल्या निर्मितीपुढे आत्मज्ञानाचे ध्येय ठेवण्यासाठी मुळातच तशा प्रकारचे पोषक वातावरण आणि संस्कार प्राप्त होण्याची गरज असते हे नाकारता येणार नाही आणि म्हणून बोरकरांच्या बाबतीत ही मार्गक्रमणा कशी पार पडली ते पहाणं अगत्याच आहे.

**कवि-योनित जन्म :**

मुळात उत्स्फूर्त आणि उत्तुंग अशा काव्याची निर्मिती करणारा कवि हा जन्माला यावा लागतो हे कुणीही नाकारणार नाही. ते गुण जर बीजांत नसतील तर काव्यानंदाच्या फुलांची उधळण करणारा वृक्ष कसा निर्माण होईल. खुद्द बोरकरांनीही असं म्हटलय की 'यक्ष, गंधर्व ही जशी एक योनि आहे तशीच कवि ही सुद्धा एक योनि आहे.'आणि या योनित आपला जन्म झाला याचा

बोरकरांना अभिमान वाटत असे. मात्र अशा तऱ्हेन कितीही शुद्ध आणि सुगुणी बीज असलं तरी योग्य व पोषक वातावरण आणि आवश्यक तेवढं खतपाणी मिळालं तरच त्याचा सशक्त वृक्ष होत असतो.

**बालपणातील संस्कार :**

बोरकरांच्या एकूणच जडणघडणीत त्या काळातील कौटुंबिक, सामाजिक वातावरणाचा आणि गोव्यातील रमणीय वनश्रीचा फार मोठा वाटा आहे.

बोरकरांचा जन्म ३० नोव्हेंबर १९१० रोजी गोव्यातील कुडचडे या गावी झाला. मात्र त्याचं सारं बालपण गेलं ते त्यांच्या बोरी या गावी. बोरी गाव सुंदर आहे. नदीच्या काठावर असणाऱ्या शेतीपलीकडे वसलेला. मागे डोंगर. गावांत छोटी छोटी घरं आणि त्याभोवती सदैव हिरवीगार असणारी कुळागारं निसर्गाशी फारकत घेऊन काँक्रिटच्या जंगलात राहणाऱ्या आधुनिक मानवाला निर्सगही मानवाला घडवतो हे समजणं कठिण आहे. मात्र बोरकर म्हणतात. 'जगभर विखुरलेल्या निसर्ग सौदर्यातलं सार तिळातिळानं निवडून परमेश्वरानं 'तिलोत्तमा' निर्माण केली तीच ही गोव्यातील वनश्री, पण ही तिलोत्तमा विकार चाळवणारी नाही तर शमवणारी आहे, भोगविलास जागवणारा नाही तर कलाविलास सुखावणारी आहे, बहिर्मुखतेला आवाहन करणारी नाही तर अंतर्मुखतेची गोडी लावणारी आहे.'[२] आता ही वनश्रीसुद्धा अशी का झाली असावी असा विचार केल्यास आपल्या ध्यानात येतं की या वनश्रीच्या कोंदणात जागोजागी वारुळासारख्या उभ्या राहिलेल्या मंदिराची आणि त्यामुळे निर्माण झालेल्या धार्मिक वातारवणाची ती किमया होती.

बोरकरांनी लहानपणी आपल्या आजीला दगडाच्या मूर्तीशी, कुत्र्यामांजराशी आणि परिसरातील झाडांशीही बोलताना पहिलं होतं. त्यामुळे तेही आपली बालपणीची सुख-दुःख परसातील पारिजातकाला, बकुळीला सांगत असंत आणि त्यांच्या फुलांचा सडा अंगावर पडला तर आपल्याला प्रतिसाद मिळाला असे त्यांना वाटे. एका बाजूनं साऱ्या चराचरांत भरुन राहिलेल्या चिरंतनाशी सुसंवाद साधण्याच आणि दुसऱ्या बाजुनं अहंविलोपनाचं बाळकडूच बोरकरांना मिळत होतं.

अशा तऱ्हेन अत्यंत रम्य असा निसर्ग, घरांत आणि घराभोवती असणाऱ्या मंदिरमय परिसरातील सश्रद्ध, धार्मिक वातावरण बोरकरांच्या घरातला दिवस भुपाळ्यांनी सुरु होई आणि त्याची सांगता रोज रात्री भजनाने होई. रोज एक तरी अभंग पाठ करुन रात्रीच्या भजनांत म्हणायचा असा मुलांना दंडक होता. अक्षर ओळख झाल्यावर बोरकरांची वाचनाची भूक भागली ती नामदेव, तुकाराम इत्यादी संताच्या गाथा वाचून. हरिविजय, पांडवप्रताप, ज्ञानेश्वरी आणि 'अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे' म्हणणाऱ्या - सोयरोबांची कवनं वाचून मुळातच भावनोत्कट असणाऱ्या बोरकरांच्या मनाला लहानपणीच परमेश्वराची ओढ लागलेली दिसते. वयाच्या फक्त १७ व्या वर्षी लिहिलेल्या-

अनंता तुला कोण पाहू शके?
तुला गातसा वेद झाले मुके
तुझ्या दृष्टिसौख्या कसे आदरुं?
तुझ्या दर्शनाविण कैसा उरु?[३]

या काव्यरचनेवरुन त्या वयातही असणारा त्यांचा आर्त भाव दिसून येतो.

**तारुण्यातील तत्त्वज्ञान वाचन :**

या नंतरच्या तरुण वयात स्वामी रामतीर्थ आणि विवेकानंद यांच्या तात्विक चिंतनाची पुस्तके बोरकरांच्या वाचनात आली. त्यामुळे त्यांची भावूकता अधिक सखोल अशा आध्यात्मिक ज्ञानाकडे वळू लागली. वयाच्या २४ व्या वर्षी लिहिलेल्या 'प्रसादाची वाट' या काव्यरचनेत परमेश्वर आपल्या अंतर्यामी आहे हे स्पष्ट करुन त्याच्या प्रगटीकरणासाठी आपल्या शरीराची व मनाची प्रथम सफाई

करायला हवी असं ते सांगून जातात आणि त्यासाठी कोटी कोटी संकटांनाही सामोरं जायची तयारी दाखवितात

धाड देवा ऐशा संकटाच्या कोटी
होवो ताटातुटी दांभिकांची
संकटाची सुरी लागता जिव्हारी
अमृताची झरी पोटी झरे
कळे मज जिवी कोठे तुझा वास
वाटती सायास निर्माल्ये गा
वार घेता वाटे दिव्य हे शरीर
तुझेच मंदिर अनंता रे
करितो मी तेथे भावे झाडलोट
प्रसादाची वाट पहातसे॥(४)

**महात्माजींचा प्रभाव :**

यानंतर साधारणपणे वयाची तिशी उलटल्यावर बोरकरांवर महात्मा गांधीच्या व्यक्तिमत्वाचा आणि विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो. बोरकराना गोवा मुक्ती लढ्याप्रमाणेच भारतीय स्वातंत्र्यलढ्याबद्दलही आस्था होती. मातृभूमीच्या प्रति असणारी त्याची प्रेमभावना केवळ स्वातंत्र्यगीते लिहून स्वस्थ बसणारी नव्हती. मुलाबाळांची आणि कुटुंबाची आबाळ होणार याची स्पष्ट कल्पना असूनही नोकरीवर लाथ मारुन गोवामुक्ती आंदोलनात त्यांनी स्वत:ला झोकून दिलं होते.

मात्र गांधीजीचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव हा राष्ट्रनेत्याच्या अथवा स्वातंत्र्यसेनानीच्या भूमिकेतून पडलेला नव्हता. बोरकर गांधीजीकडे वळले ते एक महात्मा म्हणून, त्यांच्यातील संतपण जाणवलं म्हणून, भारतीय संस्कृतीन निर्माण केलेल्या अनेक थोर विभूतिपैकी एक म्हणून, बोरकरांना आकर्षण वाटल ते गांधीजीनी धरलेल्या सत्याच्या आग्रहाच, अहिंसक प्रतिकाराचं, त्यांच्या वैयक्तीक साधेपणांच आणि त्यागाच, देशातील गोरगरीब आणि दलित यांचेविषयी त्यांना वाटणाऱ्याअपार करुणेचं. 'सायंप्रार्थना' या आपल्या काव्यरचनेत गांधीजीच्या दर्शनासाठी बोरकर किती आतूर झाले होते ते खालील पंक्तीवरून स्पष्ट होतं

'डोळ्यात घेऊनी प्राण तिष्ठलो दारी
ओवीत अंतरी भावभक्तीचे झेले'

प्रार्थना संपवून गांधीजी जेव्हा त्याच्यासमोरुन गेले तेव्हा आपण धन्य झालो असं वाटून बोरकर म्हणतात

'शुभसंचित फळले दिसला प्रभू साकार'

ज्या रस्त्यावरून गांधीजी गेले तो रस्ताही कृतार्थ झाला असं वाटून बोरकर म्हणतात.

''धजलो न तया मी तुडवाया या चरणी
प्रभू तुमचे दर्शन घडले झडले पाप''

म्हणणारे बोरकर गांधीजींना एक संत, प्रेषित मानत होते व भक्ताच्या भूमिकेतून त्यांन पाहत होते. बोरकरांची गांधीजींशी जेव्हा पहिली भेट आणि मुलाकात झाली तेव्हां गांधीजींनी पण कालेलकरांकडे त्यांचा उल्लेख 'भक्तमाणस' असा केला होता. याच सुमारास दुसरं महायुद्ध नुकतंच संपल होतं. या महायुद्धात झालेल्या नरसंहारानं व्यथित झालेल्या बोरकरांना अहिंसेचा संदेश देणारे गांधीजी जगाला तारणारे प्रेषित वाटले.

यानंतर पुढे बोरकर काही काळ साबरमती आश्रमातही जाऊन राहिले. महात्माजी आणि विनोबाजी यांचे जीवन त्यांनी जवळून पाहिलं. अशा थोर विभूतीनाच जीवनाचा खरा अर्थ समजतो असा विचार मनांत येऊन एक सुप्रसिद्ध काव्यरचना जन्माला आली.

मी पण ज्यांचे पक्वफळापरि
सहजपणाने गळले हो जीवन त्यांना कळले हो.

साबरमती आश्रमातील वास्तव्यानंतर बोरकरांवरील महात्माजींचा प्रभाव खूपच वाढला. गांधीजींच्या जीवनावर

'महात्मायन' हे एक महाकाव्य लिहिण्याचा बोरकरांनी संकल्प केला. या महाकाव्यातील काही भाग वाचल्यावर तर असं दिसतं की बोरकर हळू हळू महात्माजींना परमेश्वराचा दहावा अवतार मानू लागले होते.

प्रभूस पावली यज्ञस्तुती। दशम अवतार होईल भारती।
मोहनमूर्ती नामे ख्याती। लोकत्रयी पावेल॥
हा निर्मळ निष्कलंक। आत्मलक्ष्यी सत्यशोधक।
देव असून होईल सेवक। आर्ताचिये कारणे॥
हा अहिंसे होईल रुप। स्वभावधर्मे सत्यदीप।
निर्भय निवांत चिरंतर। पाप ताप हरावया॥
हा रंकास करील बळी। साम्राज्य घालील पाताळी।
अकिंचन राहून पायाजवळी। लीन करील कुबेर इन्द्र॥(५)

**रमण महर्षींचा प्रभाव :**

साबरमती आश्रमात असताना एक दिवस अध्यात्मिकतेवर चर्चा चालू होती. अचानक काका कालेलकर उठले आणि त्यांनी पॉल ब्रंटनचं A Search in secret India हे पुस्तक बोरकरांना दिल आणिा म्हणाले 'प्रथम हे पुस्तक वाचा मग आपण बोलू' ब्रंटनचं हे पुस्तक वाचून अनेकांप्रमाणे बोरकरही प्रभावित झाले. त्यांना आठवण झाली ती १५/२० वर्षापूर्वी बेळगाव मुक्कामी पाहिलेल्या रमण महर्षींच्या फोटोची. रमण महर्षींचे ताऱ्याप्रमाणे चमकणारे तेजस्वी डोळे पाहून बोरकरांना रमणाश्रमांत जाण्याची इच्छा झाली होती. पण ते तेव्हा जमून आल नाही. ब्रंटनच पुस्तक वाचून बोरकरांच्या मनावरील महर्षींचा प्रभाव वाढला. मात्र महर्षींच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्यासाठी आणखी काही वर्षे जावी लागली. याच काळात लिहिलेल्या ''गुरूवर अनुसर रे'' या काव्यरचनेवरून बोरकरांच्या त्या काळातील चित्तवृत्तीची कल्पना येते. या कवितेत ते प्रथम गुरूची वैशिष्ठ्ये दाखवतात. आईहून ममताळू, पित्याहून कनवाळू आणि मित्राहून स्नेहाळू असणारा गुरु 'चिरसुखसागर' असतो असे ते म्हणतात.

''गुरुच्या नेत्री सूर्य तळपती
गुरुच्या हास्यी चन्द्र झळकती''

या पंक्तीवरून मात्र बोरकरांच्या नजरेसमोर असणारी गुरुची प्रतिमा ही रमण महर्षी आणि महात्माजी या दोन्ही श्रेष्ठ विभूतींना सामावणारी असावी अस वाटत. गुरुची कृपा झाली. तर काय होऊ शकत ते सांगताना बोरकर म्हणतात-

गुरुकृपेन स्मृती उजळती
त्रिकाळ डोळ्यापुढती दिसती
पिंडी मिळे ब्रह्मांडाप्रतिती
हृदयी विश्व तरे॥

गुरुकृपेन ज्या स्मृती जागृत होतात त्या आध्यात्मिकतेच्या मार्गावरील वाटचालीच्या, त्याही गतजन्मी केलेल्या. त्यामुळे या जन्मातील वाटचाल सुकर होते आणि गुरुच्या मार्गदर्शनामुळे पिंडी ब्रह्माडाला जाऊन मिळते. यावरून बोरकरांच्या मनाची धाव कोणत्या दिशेन चालली होती हे स्पष्ट होत.

आध्यात्मिकतेच्या या रस्त्यावरची वाटचाल म्हणजे एक घनघोर संग्राम असतो. आपल्या अंतरंगांत चालणारा. आपल्यातील सत्प्रवृत्तींचा आपल्याच अपप्रवृत्तींबरोबर होणारा. त्यामुळे या खडतर प्रवासात माणूस चार पावले पुढे जातो. पण नंतर ऐहिकतेच्या बेड्यामुळे असो अथवा एखाद्या प्रलोभनामुळे असो दोन पावले मागेही येतो आणि म्हणूनच या परिस्थितीची जाणीव असणारे बोरकर परमेश्वराला म्हणतात -

''क्षेत्र परम दावुनि नयना का घालिसि बेड्या पायी
विशाल देऊनि पंख मनाला कोंडिसि कां या देही
दरवळ उधळुनि अवतीभवती मोडिसि का उरी कांटा
पळभर उजळूनि काजळिसि का चिरयात्रेच्या वाटा?''

यात परमेश्वर प्राप्तीची ओढ दिसून येतेच परंतु या

प्राप्तीच्या मार्गातील अडचणींच्या जाणीवेन कळवळून केलेली आळवणी आपल्याही मनाला छेदून जाते. या कवितेत शेवटी ''प्रभू, तुझा खेळ चालू आहे पण माझा जीव जातो आहे'' अस देवाला सांगणारे बोरकर अखेरची विनवणी करतात -

देह उरो उपकारापुरता पाश सकल हे सोडी
संसाराच्या कटुतेतुनी परि दे अंती तव गोडी॥

यानंतर १९५१ साली बोरकरांनी रमणाश्रमाला भेट दिली. त्यानंतर पुढे काही वर्षांनी नरसिंहस्वामींनी लिहिलेल रमण महर्षींच चरित्र बोरकरांनी वाचल ते वाचताना त्यांनी सांगितलेला आत्मदर्शनाचा मार्ग विशेष काळजीपूर्वक वाचला असे बोरकर नमूद करतात.

''आपल्या खऱ्या स्वरूपाचा विसर पडल्यामुळे माझा देह म्हणजेच मी असा भ्रम माणसाला होतो आणि त्यामुळे तो आनंदमय असुनही सतत दु:खेच भोगीत असतो आणि म्हणून आपले खरे स्वरूप काय याचा शोध घेण्याची नितांत आवश्यकता आहे'' हा रमण महर्षींच्या विचारधारेचा प्रमुख धागा. बोरकर म्हणतात ''पण महर्षींचे म्हणणे मला समजायला जड गेले नाही. प्रत्ययाने नव्हे पण विचाराने ते मला ठाऊक होते. अस मला वाटलं'' आणि एकदम त्यांना कसली तरी आठवण झाली. संतकवि कृष्णभट बांदकरांच्या ''स्वात्मतत्त्वामृतशतक'' या शंभर श्लोकांच्या काव्यांत हाच विचार मांडला होताा.

एकंदरीत सोयरोबा, बांदकर आणि इतरही सर्व संतकवींच्या रचना बोरकर लहानपणापासून वाचत होते. त्या सर्व संतकाव्यातील विचारांचा त्यांच्या अंतर्मनावर परिणाम झाला होता आणि तोच त्याना आध्यात्मिकतेच्या वाटेवर पुढे पुढे नेत होता. नवनवीन अनुभवान संपन्न करत होता. स्वामी रामतीर्थ, विवेकानंद, रमण महर्षी इत्यादिकांचे विचार त्यांनी वाचले, ग्रहण केले मात्र आत्मसाधनेचा मार्ग जो त्यांनी चोखाळला तो त्यांच्या स्वभावधर्माला रूचेल, पचेल असाच किंबहुना त्यांचा अंतरात्माच त्यांना मार्गदर्शन करत असावा अस दिसत.

**आध्यात्मिक प्रगति :**

आध्यात्मिक साधना म्हटल्यावर साधारणपणे आपल्या नजरेसमोर येतो तो हठयोग, राजयोग, मंत्रयोग, ज्ञानयोग इ. आणि त्यांनी पुरस्कारिलेल्या ध्यान-धारणा, मंत्र, जप, नामस्मरण इत्यादी साधना परंतु या प्रकारची कोणतीही पारंपारिक साधना बोरकरांनी केलेली दिसत नाही. बोरकरांवर झालेल्या विविध संस्कारांकडे आपण नजर टाकली पण म्हणूनच आता प्रश्न उरतो की मग बोरकर कोणत्या मार्गान जात होते? कोणती प्रगति साधली होती? किंबहुना कोणत्या मानसिक अवस्थेस जाऊन पोहोचले होते?

बोरकरांच्या सत्तराव्या वाढदिवशी त्यांचा एक स्नेही त्यांच अभीष्ट चिंतन करताना म्हणतो -

''विष्णुसहस्त्रनामामध्ये जन्ममृत्यूजरातिग:'' : असे एक ईश्वराचे नाम आलेले आहे. मानवाला हे जन्म - मृत्यूजरेचे दोष लागले आहेत. मात्र मनाने आणि वृत्तीने तो या दोषांपलीकडच जीवन जगू शकतो हे आपण सिद्ध करून दाखवल आहे.''(६)

अखेरच्या काळातील काही काव्यरचना व त्यांतून मृत्यू आणि पुनर्जन्म यावर बोरकरांनी व्यक्त केलेले विचार पाहिल्यास त्यांच्या ह्या ''जन्ममृत्यूजरातिग:'' झालेल्या मानसिकतेची आपणास कल्पना येते.

महानतेच्या ज्योतिर्जगति अखंड अमुचा वास
अम्हाला चिरंतनाचा ध्यास.

अस म्हणणाऱ्या बोरकरांची चिरंतनाची ओढ आता खूपच वाढली होती. मृत्यूच्या फक्त ४५ दिवस आधी लिहिलेल्या तम:स्तोत्रावरून वृद्धत्वामुळे येणाऱ्या शरीर भोगांना ते किती शांतपणे सामोरे जात होते ते दिसून येतं.

बोरकरांना जीवनाची ओढ होती पण मृत्यूची अपरिहार्यताही त्यानी सहज स्वीकारली होती. मृत्यूला परमसखा मानणारे बोरकर 'विझवूनी दीप सारे मी चाललो निजाया' अशी भावना सहज व्यक्त करतात. ज्यानं जळण्याचं बळ दिल त्यालाच आता विझण्याचही बळ दे अशी प्रार्थना करून

आनंदाकुर होऊनी जैसा
आलो रुपाकारा
सुटुनी त्यांतुनि घेऊ दे मज
मूळ अरूप निवारा

अशी इच्छा व्यक्त करतात.

जीवन म्हणजे जडत्वापासून अनंतापर्यंत चालणारा प्रवास. या प्रवासांत वारंवार नवजीवन प्राप्त करून देण्यासाठी मृत्यू ही प्रक्रिया पद्धति आहे अस मानून भारतीय संस्कृति मधील पुनर्जन्माच्या सिद्धांतावर गाढ श्रद्धा ठेवणारे बोरकर म्हणतात - '' मृत्यूची धास्ती मला कधीच शिवली नाही'' कारण

कैकदा मेलो तसा मी कैकवेळा जन्मलो
त्यामुळे मी मृत्यूच्या खाद्यावरि रे खेळलो

याच काव्यांत मृत्यूच भय का वाटतं ते विशद करताना बोरकर म्हणतात -

दु:ख देई तो न मृत्यू शृंखला आसक्तिची
ती जळू होते जीवी त्याने दिलेल्या शक्तीची
जाणले जात्याच जे हे बाणले अभ्यंतरी
आज देहातीत तेणे राहतो देही जरी(७)

यातील शेवटच्या ओळीवरून स्पष्ट होत की बोरकर त्याच्या शेवटच्या आयुष्यात 'देहातीत' अशा मानसिकतेला जाऊन पोहोचले होते.

**निसर्गाच्या सान्निध्यातील सौंदर्ययोगी :**


बोरकरांच्या जीवनाकडे आपण दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला अस दिसत की जेव्हा जेव्हा त्याना गोव्यापासून दूर जावं लागल तेव्हा तेव्हा त्याची मनस्थिति पाण्याविना तळमळणाऱ्या माशासारखी झाली. अध्यात्माची ओढ असणारा संसारीभक्त जसा अधून मधून आपली बॅटरी चार्ज करण्यासाठी आपल्या गुरुकडे धाव घेतो, गुरुच्या सान्निध्यात काही काळ घालवतो तसे बोरकर गोव्याकडे, गोव्यातील निसर्गाकडे ओढले जात होते.

बोरकरांच्या या आध्यात्मिक वाटचालीत निसर्गाचा विशेषत: गोव्यातील निसर्गाचा फार मोठा वाटा होता. या निसर्गाशी तादात्म्य पावल्यामुळेच आपल्याला परम चैतन्याचा संजीवक संस्पर्श लाभला हे स्पष्ट करताना बोरकर म्हणतात-

''गोव्यासारख्या परमसुंदर निसर्गभूमीत मी जन्माला आलो हे माझे अहोभाग्य. तिचे सौंदर्य चटकन टिपण्याची दृष्टी मला लाभली हे त्याहीपेक्षा मोठे अहोभाग्य. त्याच्यांत वारंवार रमत तादात्म्य पावत राहिल्यामुळे विविध दिव्य भाव माझ्यात नेहमी उमाळत राहिले. त्यामुळे माझ्यातले खळमळ अनायासे वाहून गेले. प्रत्येक वेळी मी शुचिर्भूत आणि फुलासारखा हलका होऊन निघालो. पूजा-अर्चा, कौल, प्रसाद, व्रते, वैकल्ये, ध्यान-योगादि साधना असल्या कोणत्याही गोष्टी न करता केवळ निसर्ग तादात्म्यामुळे परम चैतन्याचा संजीवक संस्पर्श मला सतत मिळाला आहे.''(८)

यावरून अस दिसत की आध्यात्मिक प्रगति साधण्यासाठी आवश्यक असणारी मानसिक शुद्धी बोरकरांना साधता आली ती निसर्ग सान्निध्यामुळे, निसर्गाशी एकरूप झाल्यामुळे. परंतु त्याशिवाय त्या परमपवित्र अशा वनश्रीचे आणि त्यातील चैतन्याचे सौंदर्य न्याहाळताना आणि ते ही अनासक्त अशा सौंदर्यदृष्टीने, बोरकरांनीच अन्यत्र म्हटल्याप्रमाणे ते केवळ सौंदर्यवादी

राहिले नाही तर ते चिरंतन सौंदर्याचा वेध घेणारे सौंदर्ययोगी बनले.



**अंतर्यामीचा लययोगी :**

मात्र याचवेळी त्यांच्या अंतरंगांत निर्माण होणारा काव्यनिर्मितीचा झरा शब्द सुरांच लेणं लेवून लयबद्ध नर्तन करत होता.

हे सगळ विश्व म्हणजे एका विराट लयीची लीला शिवाच तांडवनृत्य आणि प्रणवाचा धीरगंभीर स्वर यातूनच साऱ्या विश्वाची निर्मिति झाली. सूर म्हणजे काळाच्या पृष्ठभागावर उमटलेला बुडबुडा, एक तरंग. तो येतो तेव्हा लयीच अस्तित्व प्रगट होत. कारण सूर हा लयीच्या नर्तनाचा भाग आहे. साऱ्या विश्वात ही लय भरून राहिली आहे. आपणही त्या वैश्विक लयीवरचे तरंग आणि म्हणून ज्याला त्या विराट वैश्विक लयीची अनुभूती होते तो योगी होतो.

खांडेकरांनी म्हटलय ''कवितेच्या वेषभूषेत तिळभर-सुद्धा वैगुण्य राहू नये म्हणून बोरकर शब्दांच्या माधुर्याबद्दल दक्ष असतातच पण शब्दांच्या माधुर्यापेक्षाही त्यांच्या कवितेतील नादाचे नर्तन अत्यंत मोहक आहे.''[९] बोरकरांच्या काव्यरचनेत हा नाद सातत्याने प्रगट होताना दिसतो कारण त्यांच्या अंतरंगातही तो नाद सतत घुमत होता. अथर्वशीर्ष आपल्याला सांगत की गणेश हा नादरूपही आहे. स्वयंभू असल्यामुळे त्याला लय आहे. आपण 'ॐ गं' जेव्हा म्हणतो तेव्हा त्याचे स्वर त्या लयीमधून प्रगट होतात म्हणून तो लयस्वरूपही आहे आणि लयस्वरूप असल्यामुळे शब्द प्रगट करण्याचे सामर्थ्य या ॐकाराच्या जवळ आहे. अशा या नादस्वरूपी ईश्वराशी अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न हाच लययोग. याच नादमग्नतेत बोरकर गुंग असत आणि म्हणूनच खांडेकर म्हणतात ''बोरकर गुंगत कविता करतात का कविता करताना गुंग होऊन जातात ते कळत नाहीत.

मला मात्र मनोमन पटलय की ज्याप्रमाणे एखादा योगी परमेश्वराच्या प्रति ध्यानमग्नतेत गूंग होऊन समाधी अवस्थेला पोहोचतो त्याचप्रमाणे बोरकर आपल्या अंतर्यामी शब्द सुरांच्या लयबद्धतेत गूंग होऊन तशाच अवस्थेचा अनुभव घेत असावेत आणि म्हणूनच ते म्हणतात की काव्यनिर्मिति ही आध्यात्मिक साधना आहे. लययोगाची ही एक हृदयंगम कला आहे.

बोरकरांचा हा योग जीवनस्पर्शी आणि जीवनाभिमूख होता.

संकटाचा कोण केवा? दु:ख खोटे दैन्य खोटे
वा तयाशी झुंजताना भोगिले ऐश्वर्य मोठे

अस म्हणणारे बोरकर जीवनाला भिऊन, कंटाळून अथवा तुच्छ मानून जीवनापासून दूर पळाले नाहीत.

एका बाजूला सध्याची वास्तववादी आणि केवळ षौक अथवा छंद मानून चालणारी काव्यनिर्मिति आणि दुसऱ्या बाजूला पारंपारिक योगमार्गाची जीवनाला नाकारून चालणारी अध्यात्म साधना अशा वातावरणात -

बोरकारांनी एका बाजूला निसर्ग सान्निध्यात अनासक्त सौंदर्यदृष्टीन चराचरातील चैतन्याच्या सौंदर्याचा वेध घेत चालणारा सौंदर्ययोग आणि दुसऱ्या बाजुला अंतरंगातील नादब्रह्मात गूंग राहून विराट वैश्विक लयीची अनुभूती प्राप्त करण्याचा लययोग यांचा एक अनोखा समन्वय साधला. आपल्याला पचेल, रूचेल अशा मार्गान चिरंतनाचा स्पर्श तरी अनुभवला आणि म्हणूनच ते म्हणाले ''काव्य ही एक आध्यात्मिक साधना आहे. आत्मविद्येचा एक आगळा व लोभसवाणा असा आविष्कार आहे. लययोगाची ही एक हृदयंगम कला आहे.''

**कवितेची पृथगात्मता :**

१) बा. भा. बोरकर यांच्या कवितेची पृथगात्मकता डॉ. आशा सावदेकर

२) घुमटावरले पारवे

३) 'बाष्पसमर्पण', बोरकरांची कविता

४) 'प्रसादाची वाट', बोरकरांची कविता

५) 'महात्मायन' पूर्वाध्याय, बोारकरांची निवडक कविता

६) 'अनासक्त कुतुहल' घुमटावरले पारवे

७) बोरकरांची समग्र कविता

८) 'कृपावंत निसर्ग' पावलापुरवा प्रकाश

९) 'जीवनसंगीत'ची प्रस्तावना - वि. स. खांडेकर

**नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी -१,
श्रीरंग सोसायटी, ठाणे
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail: nd_nadkarni@yahoo.com

●●●

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

**विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था**

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)

२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)

४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)

५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

७) वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान संस्था

११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

पदाची शान व ज्ञान वाढेल असे अधिकाऱ्याने वागावे.

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा माध्यमिक विभाग

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद आयोजित ३४ व्या महानगरपालिका स्तरीय विज्ञान परिषदेत आमच्या शाळेच्या प्रकल्पाला प्रथम पारितोषिक मिळाले. एकूण १०२ शाळांनी भाग घेतला होता. आमच्या शाळेच्या प्रकल्पाची जिल्हा स्तरासाठी निवड झाली.

प्रकल्पाचे नाव : मायक्रो हायड्रोपॉवर प्लान्ट

सहभागी विद्यार्थ्यांची नावे : अमित पाटणकर आणि मिहिर कुलकर्णी

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### ✦ उपयुक्त मार्गदर्शन :

ठाणे सायबर क्राईम सेल व नॅसकॉम यांनी दि. १८ सप्टेंबर पासून चालू केलेल्या सायबर सेफ ठाणे मोहिमेअंतर्गत दि. १८ सप्टेंबर रोजी ठाण्यातील बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ''Latest Trends in Information Security and hacking techniques'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. रोहन पाटील Vista Infosec Pvt. Ltd यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी व्याख्यानाला DCP श्री. देशमाने, ACP श्री. जाधव तसेच पोलिस सब इन्स्पेक्टर उषा सूर्यवंशी उपस्थित होत्या. या प्रसंगी ACP जाधव यांनी सायबर वापरावयास सोपे परंतु गैरवापरातील धोके याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले.

बांदोडकर कॉलेजच्या प्रा. काळे यांनी ठाणे सायबर क्राईम सेल व नॅसकॉम यांनी सुरू केलेल्या या मोहिमेकरता त्यांना धन्यवाद दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिल्याबद्दल आभार मानले. या कार्यक्रमाला बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ठाणे व मुंबई परिसरातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक उपस्थित होते.

### ✦ कीटकांचे अदभुत विश्व : चर्चासत्र

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'कीटकांचे अदभुत विश्व' या विषयावरील एक दिवसीय चर्चासत्र बुधवार दिनांक ३ डिसेंबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले.

पहिल्या सत्राचे अध्यक्ष कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे डॉ. रा. प. भवाने हे होते. त्यांनी आपल्या बीजभाषणात कीटकांच्या वर्गीकरणाचा आढावा घेतला. आपल्या अवतीभोवती आढळणाऱ्या कीटकांमध्ये असलेल्या विविधतेची त्यांनी सविस्तर माहिती दिली. या सत्रात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या फुलपाखरांसंदर्भात निसर्ग उद्यान येथील फुलपाखरांमधील जैवविविधता यावर आपले निरीक्षण सादर केले. या सत्रात पाटकर महाविद्यालय, झेवियर्स महाविद्यालय, बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी, आर के. टी. महाविद्यालय या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या चर्चासत्राच्या समन्वयक म्हणून मुलुंड येथील वि. ग. वझे महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या डॉ. सौ. हर्डीकर यांनी काम केले.

द्वितीय चर्चासत्राचे अध्यक्षस्थान पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयातील एक ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. घाटे यांनी भूषविले. ते व त्यांचे विद्यार्थी करत असलेल्या कीटकविषयक संशोधनाची त्यांनी माहिती दिली. भारतात फार मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित राहिलेल्या कीटकांच्या तीन विविध कुळांची त्यांना माहिती दिली. कीटक वर्गीकरणामध्ये आता नव्याने येऊ घातलेल्या डी. एन. ए. बारकोडिंग या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा कसा उपयोग होऊ शकतो यावर ते सध्या काम करीत आहेत.

या सत्रामध्ये 'जागतिक वन्यजीव निधी'च्या कार्यकर्त्यांनी तसेच बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे व झुनझुनवाला महाविद्यालय घाटकोपर येथील विद्यार्थ्यांनी कीटकांसंदर्भात आपले संशोधन स्लाईड शो च्या माध्यमातून सादर केले.

या चर्चासत्राच्या समन्वयक म्हणून उल्हासनगर येथील आर. के. टी. महाविद्यालयाच्या डॉ. सौ. मुखर्जी यांनी काम पाहिले.

पुढील सत्रात पुण्यातील ज्येष्ठ नामवंत प्राणिशास्त्रज्ञ डॉ. रामचंद्र रानडे यांनी आपल्या बीजभाषणात 'नांगी विरहित मधमाशी' या मधमाशीच्या एका प्रजातीवर अतिशय रोचक माहिती दिली. वयाच्या ७० व्या वर्षी रानडे सर उत्साहाने या मधमाश्यांवर अभ्यास करीत आहेत. या सत्रात समन्वयक म्हणून डोंबिवलीच्या पेंढरकर महाविद्यालयाच्या डॉ. मानसी फणसे यांनी काम केले. या सत्रात सेंट झेवियर्स कॉलेज, पनवेल, येथील सी. के. ठाकूर कॉलेज, मुलुंड व वझे महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

शेवटच्या सत्राचे अध्यक्षपद बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. अमोल पटवर्धन यांनी भूषविले तर समन्वयक म्हणून घाटकोपर येथील झुनझुनवाला महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी काम पाहिले. डॉ. पटवर्धनांनी क्लिक बीटल या टणक पाठीच्या कीटक या प्रजातीवर संशोधन केले आहे. विशेष म्हणजे कीटकांच्या या प्रजातीवर संशोधन करणारे अक्षरश: हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच संशोधक आहेत. यात डॉ. अमोल पटवर्धनांचा वरचा क्रमांक लागतो. आपल्या बीजभाषणात डॉ. पटवर्धनांनी या प्रजातीवरील चाललेल्या संशोधनाची व या कीटकाची शरीर रचना जीवनशैली याची सविस्तर माहिती दिली. या सत्रात महर्षी दयानंद महाविद्यालय, परळ जागतिक वन्य निधी सी. एच. एम महाविद्यालय उल्हासनगर इ. संस्थांच्या विद्यार्थ्यांनी कीटकांविषयीचे संशोधन सादर केले.

या शेवटच्या सत्रानंतर समारोप समारंभ झाला. यामध्ये या एकदिवसीय परिसंवादाचे मुख्य समन्वयक डॉ. आर. पी. आठल्ये जीवशास्त्र विभाग बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, डॉ. सौ. माधुरी पेजावर, प्राचार्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, डॉ. पुरुषोत्तम जोशी निवृत्त प्राध्यापक पुणे विद्यापीठ इ. वक्त्यांची भाषणे झाली. याच कार्यक्रमात छायाचित्रण स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, शोधनिबंध सादरीकरण स्पर्धांसाठी पारितोषिक वितरण करण्यात आले.

समारोपाचे सूत्रसंचालन डॉ. सौ. वैशाली सोमणी यांनी तर इतर सत्रांचे सूत्रसंचालन डॉ. सौ. पुनम कुरवे व डॉ. संजय जोशी यांनी केले.

### ✦ विज्ञान महाविद्यालयाचे पॅरामाउंट २००८ स्पर्धेतील घवघवीत यश :

डी. वाय. पाटील व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातर्फे पॅरामाउंट २००८ ही कला व क्रीडा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला 'सर्वोकृष्ट महाविद्यालय पॅरामाउंट २००८' (Best College of Paramount 2008) हा किताब मिळाला.

महाविद्यालयातर्फे ८० विद्यार्थ्यांनी कॅरम एकेरी, कॅरम दुहेरी, सोलो डान्स, ग्रुप डान्स, सोलो सिंगींग, टेबल टेनिस, फेस पेंटींग, अंताक्षरी, बॉक्स क्रिकेट, मॉडीफाय सॉकर, उल्टा सोचो, ट्रेजर हंट, फॅशन शो, बद्धिबळ, Mr. Paramout अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला होता.

सोलो डान्समध्ये द्वितीय वर्षातील कु. अक्षता कोळी हिला द्वितीय पारितोषिक मिळाले. कॅरम एकेरी मध्ये कु. कोमल सावळा हिला प्रथम पारितोषिक व प्रज्ञा कोचरेकर हिला द्वितीय पारितोषिक मिळाले. तसेच कु. कोमल सावळा व प्रज्ञा कोचरेकर यांना कॅरम दुहेरी मध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. स्नेहा गुजराती व योगिता व यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. मुलांमध्ये कॅरम दुहेरीत कु. शैलेश व संदीप यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

टेबल टेनिस स्पर्धेमध्ये अनिश कदम याला प्रथम पारितोषिक तर प्रतिक सावंत याला द्वितीय पारितोषिक मिळाले.

ट्रेजर हंट या स्पर्धेमध्ये ओमकार थोरात, भूषण प्रभू, सोनेश कांबळे व रणजित या विद्यार्थ्यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

उल्टा सोचो यामध्ये कु. अक्षता कोळी व संजय सावंत यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

तसेच या Paramount २००८ स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांचा एक लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महाविद्यालयाचा कु. प्रमोद पाटील हा विजेता ठरला त्याला बँकॉकची सफर करण्याची संधी मिळणार आहे.

विज्ञान महाविद्यालयातर्फे अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता विद्यार्थांना प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, उपप्राचार्या सौ. मीरा अकोलकर, सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश माळी तसेच जिमखान्याचे संयोजक प्रा. प्रकाश बामणे यांचे नेहमी मार्गदर्शन लाभत असते.

✦ २६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर दहशतवाद्यांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात अनेक निरपराध लोकांचे बळी गेले. पोलीस अधिकारी व लष्करातील जवान या हल्ल्यात शहीद झाले. विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी समितीच्या (Student Council) विद्यार्थ्यांनी प्राचार्यांसोबत झालेल्या बैठकीत असा निर्णय घेतला की, यावर्षी कोणतेही मोठ्या आवाजाचे संगीत लावून कार्यक्रम होणार नाहीत. तसेच टॅलेन्ट हंट सारखी विद्यार्थ्यांना बौद्धिकदृष्ट्या आव्हाने देणारे कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात येतील. ही बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी शहीदांना दिलेली ही आगळीवेगळी मानवंदना असेल.

या हल्ल्याचा निषेध म्हणून महाविद्यालयातर्फे दिनांक २३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता महाविद्यालयाच्या आवारात शांतता यात्रा (Peace Ralley) आयोजित करण्यात आली. यामध्ये सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी महाविद्यालयाच्या संपूर्ण आवाराला एक फेरी मारून नंतर वा. ना. बेडेकर यांच्या पुतळ्यासमोर मेणबत्ती प्रज्वलित करून शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली.

## वि. प्र. मं. तंत्रनिकेतन विभाग

**✦ नायक सरांना राष्ट्रीय पुरस्काराचा बहुमान :**

टेक्निकल एज्युकेशनच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामासाठी व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकचे प्राचार्य दि. कृ.



**प्रा. दि. कृ. नायक**

नायक यांना 'राजाराम बापू पाटील नॅशनल अॅवार्ड फॉर प्रॉमिसिंग टीचर' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशनच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला आहे. ओरिसा इथे ओरिसाचे राज्यपाल एम. सी. भंडारे आणि केंद्रीय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री एम. ए. फातमी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्राचार्य दि. कृ. नायक यांना प्रदान करण्यात आला.



**ओरिसाचे राज्यपाल एम. सी. भंडारे आणि केंद्रीय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री एम. ए. फातमी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्राचार्य दि. कृ. नायक यांना प्रदान करण्यात आला.**

व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकलची शिक्षणपद्धती, प्रशासकीय कामकाज, विद्यार्थ्यांसाठी विविध वर्कशॉपचे आयोजन, शिक्षकांसाठी ट्रेनिंग प्रोग्रॅम, विविध विषयावरील चर्चासत्रे अशा विविध आघाड्यांवर प्राचार्य दि. कृ. नायक यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यांची दखल घेऊनच या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली.

आय. एस. टी. ई. ही टेक्निकल एज्युकेशनच्या क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरची मोठी संस्था आहे. देशभरातील ६० हजार शिक्षक या संस्थेचे आजीव सदस्य असून दोन लाख विद्यार्थ्यांचे सदस्यत्वही त्यांच्याकडे आहे.

शिक्षकांचे करिअर डेव्हलपमेंट आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी या संस्थेची स्थापना झालेली आहे. ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन आणि मिनिस्ट्री ऑफ ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट यांच्या सहकार्याने संस्थेचे काम चालते. तंत्रशिक्षण क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पदवीदान समारंभात राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतो.

•••

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञात क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

## दिशा

**वर्गणीसाठी संपर्कः**

**विद्या प्रसारक मंडळ**

डॉ. बेडेकर विद्यामंदिर, नौपाडा, ठाणे.

दूरध्वनी २५४२६२७०

**मुखपृष्ठावरून**
**संपादकीय**
**भारताच्या सुरक्षिततेची दशा आणि दिशा**

राहू शकत नाही. भारताचे तेच झाले आहे. भारताच्या स्वातंत्र्यापासून आपल्या नेतृत्वाच्या मनात जगाच्या शांततेची जास्त काळजी.

दुर्दैवाने जगात आपल्याला कोणी विचारत नाहीच, पण शेजारीही विचारत नाहीत. यात दुसरा एक मोठा गैरसमज म्हणजे देशाच्या सुरक्षेचा प्रश्न हिंदुमुसलमान संबंधांशी निगडित आहे हा. वास्तविक मुसलमानांना आपला धर्म चांगला समजला आहे. पण हिंदूंमध्ये मात्र याबाबत दिवाळखोरी आहे. या देशातील काही हिंदूंना मुसलमानांपेक्षा इस्लाम जास्त समजला आहे असे दिसते. दुर्दैवाने इस्लाममधील सुधारणा किंवा बरेवाईट सांगण्याचा अधिकार हा इस्लाम धर्माचा सभासद असलेल्यांना आहे व ते बरोबरच आहे. हाच प्रकार ख्रिस्ती धर्माचा आहे. हिंदूंबाबत मात्र त्यांना स्वत:चा धर्म समजावून घेण्याची आवश्यकता वाटत नाही वा काही करणांनी धर्म सोडून गेलेल्यांनी केलेल्या सुधारणांच्या लुडबुडीचे त्यांना सोयरसुतक नाही.

इतर कुठलेच धर्मबांधव सर्वधर्मसमभाव मानायला तयार नाहीत. हिंदूंना मात्र कुराण किंवा बायबल न वाचता, स्व धर्माबद्दलही फारशी माहिती न घेता सर्वधर्मसमभावाचा साक्षात्कार झाला आहे. या देशाचे बहुसंख्य नेतृत्व (मग ते काँग्रेस असो, भाजपा असो वा साम्यवादी असो) हे हिंदूच आहे. प्रश्न इतकाच आहे की यांचे हिंदू असणे हा एक अपघात आहे. यांचे राजकारण हे लांगूलचालनावर आधारित आहे. मतपत्रिकेपलिकडे यांना दुसरे काही दिसत नाही. मग तो मुद्दा आरक्षणाचा असो की गरिबीचा. असे भोंगळ, कमकुवत, स्वार्थी व अपघाताने हिंदू असलेले नेतृत्व देशाला लाभले आहे. हे या देशाचे दुर्दैव आहे.

वर सांगितल्याप्रमाणे देश आणि राष्ट्रात फरक म्हणजे देश हा फक्त नकाशात असतो तर राष्ट्राला अस्तित्व असते, जिवंतपणा असतो आणि गणिती तर्कापलीकडे काही संवेदना असतात. भारत हा माझा देश आहे, हे खरे, पण ते माझे राष्ट्र झालेले नाही. नेतृत्वहीन, चंगळवादात बुडालेला आजच्या भारताचा नागरिक आहे. इतिहास हरवलेले राष्ट्र आपला भूगोलही हरवते. आज या देशाचे राष्ट्र बनवायचे असेल, ते राष्ट्र सुरक्षित करायचे असेल तर लष्करी वा शस्त्रसामर्थ्य वाढवण्याबरोबरच या राष्ट्राला कणखर, अप्रियता स्वीकारणारे नेतृत्व मिळायला हवे. रेव्ह पार्टीत सामील झालेल्या सभासदाच्या सन्मानाची काळजी असणारे राजकीय नेतृत्व या देशाला फक्त रसातळालाच नेऊ शकते, हे या समाजाला कळेल त्या दिवशी खऱ्या अर्थाने राष्ट्र- निर्मितीची सुरुवात झालेली असेल!


**डॉ. विजय बेडेकर**

●●●

एखादे सोपे काम पुढे ढकलले की ते अवघड होऊन बसते. - डॉ. राधाकृष्णन

## विपत्तीमध्ये तू माझं रक्षण करुक

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दुःखतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दुःखावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस, मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरुन जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दुःखाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करीन
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा.



गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*

☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*

☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| **सभागृहाचे नांव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना.बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

☆ **संपर्क** ☆

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.